# संत योहानाला झालेले प्रकटीकरण

**१** **येशू ख्रिस्ताचे प्रकटीकरण:** देवाने हे त्याला ज्या गोष्टी लवकरच झाल्या पाहिजेत त्या आपल्या दासांना दाखविण्यासाठी दिले, आणि त्याने आपल्या दूताला पाठवून, त्याच्या द्वारे, ते आपला दास योहान ह्याला प्रकट केले. २त्याने देवाच्या वचनाविषयी, आणि येशूच्या साक्षीविषयी, म्हणजे स्वतः बघितलेल्या सर्व गोष्टींविषयी साक्ष दिली आहे. ३ह्या संदेशाची वचने वाचणारा, ती ऐकणारे व त्यात लिहिलेल्या गोष्टी करणारे धन्य होत, कारण काळ जवळ आला आहे.

४**योहानाकडून;**

आसियात असलेल्या सात मंडळ्यांस:

जो आहे, होता आणि येणार आहे त्याच्याकडून, त्याच्या राजासनापुढील सात आत्म्यांकडून, ५आणि, जो विश्वासू साक्षी, मेलेल्यांतून प्रथम जन्मलेला, आणि पृथ्वीच्या राजांचा अधिपती आहे त्या येशू ख्रिस्ताकडून कृपा व शांती.

जो आपल्यावर प्रीती करतो व ज्याने त्याच्या स्वतःच्या रक्ताने आपल्याला आपल्या पापांतून सोडवले, ६आणि आपल्याला त्याच्या देवपित्यासाठी एक राज्य आणि याजक केले, त्याला गौरव आणि सत्ता युगानुयुग असोत. आमेन.

७बघा, तो ढगांबरोबर येत आहे! प्रत्येक डोळा त्याला पाहील, आणि ज्यांनी त्याला विंधले होते तेही पाहतील; आणि पृथ्वीवर सर्व वंश त्याच्यामुळे ऊर बडवून घेतील. हो, हे होईल. आमेन.

८परमेश्वर देव, जो आहे, होता व येणार आहे, जो सर्वसमर्थ आहे, तो म्हणतो,

"मी आल्फा आणि ओमेगा आहे."

९**मी तुमचा बंधू** व येशूच्या दुःखात, राज्यात व धीरात तुमचा सहभागी योहान, देवाच्या वचनामुळे आणि येशूच्या साक्षीमुळे पात्म नावाच्या बेटावर आलो. १०प्रभूच्या दिवशी मी आत्म्यात संचरलो, आणि, मी माझ्या मागे कर्ण्याच्या आवाजासारखा मोठा आवाज ऐकला. ११आणि तो म्हणाला,

"तू जे पहात आहेस ते एका पुस्तकात लिही; आणि ते आसियातील इफिस, स्मुर्णा, पर्गम, थुवतिरा, सार्दिस, फिलदेलफिया आणि लावदिकिया येथील सात मंडळ्यांना धाड."

१२आणि माझ्याशी बोलणाऱ्या आवाजाकडे पहायला मी मागे फिरलो, आणि मागे फिरताच बघितले की, माझ्यासमोर सात सोन्याच्या समया १३व त्या समयांच्या मध्यभागी मनुष्याच्या पुत्रासारखा, पायघोळ झगा परिधान केलेला व छातीवरून सोन्याचा पट्टा बांधलेला कोणीएक होता. १४त्याचे मस्तक व त्याचे केस बर्फाप्रमाणे पांढऱ्या असलेल्या लोकरीसारखे पांढरे होते, आणि त्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे होते. १५त्याचे पाय सोनपितळेसारखे असून भट्टीत असल्यासारखे धगधगत होते; आणि त्याचा आवाज पुष्कळ प्रवाहांच्या आवाजासारखा होता. १६त्याच्या उजव्या हातात सात तारे होते व त्याच्या तोंडामधून एक धारदार दुधारी तरवार निघाली. सूर्य आपल्या बळाने तळपतो तशी त्याची मुद्रा होती.

१७आणि मी त्याला बघितले तेव्हा मी मेल्यासारखा त्याच्या पायांपुढे पडलो तेव्हा त्याने आपला उजवा हात माझ्यावर ठेवला व मला म्हटले,

"भिऊ नको, मी पहिला आणि शेवटला आहे. १८मी जिवंत राहणारा आहे; मी मृत झालो होतो, आणि बघा, मी युगानुयुग जिवंत आहे. आणि माझ्याजवळ मृत्यूच्या आणि अधोलोकाच्या किल्ल्या दिल्या आहेत. १९तू ह्या ज्या गोष्टी बघितल्यास, ज्या आहेत, आणि ज्या पुढे होणार आहेत त्या लिही.

२०"तू माझ्या उजव्या हातात जे सात तारे बघितलेस आणि ज्या सात सोन्याच्या समया बघितल्यास त्यांचं रहस्य हे आहे: ते सात तारे त्या सात मंडळ्यांचे देवदूत आहेत, आणि तू बघितलेल्या सात समया ह्या त्या सात मंडळ्या आहेत.

२ "**इफिसमधील** मंडळीच्या देवदूताला लिही:
ज्याने आपल्या हातात सात तारे घेतले आहेत,
आणि सात सोन्याच्या समयांमधून जो फिरत आहे तो
हे म्हणतो:
२ तुझी कामे, तुझे श्रम आणि धीर, मी जाणतो;
आणि मला माहीत आहे की, दुष्ट लोक तुला सोसवत
नाहीत; आणि जे स्वतःला प्रेषित म्हणवतात, पण जे
नाहीत, त्यांची तू परीक्षा केली असून ते लबाड
आहेत हे तुला दिसले आहे. ३ तुझ्यात धीर आहे. तू
माझ्या नावाकरता सोसलेस आणि तू खचली नाहीस.
४ तरी माझ्याजवळ तुझ्याविरुद्ध काही आहे.
कारण, तू आपली पहिली प्रीती सोडली आहेस.
५ म्हणून, तू कोठून पडलीस ह्याची आठवण कर,
पश्चात्ताप कर आणि तुझी पहिली कामे कर. नाहीतर,
मी लवकर येईन, आणि तू पश्चात्ताप केला नाहीस,
तर तुझी समई तिच्या ठिकाणावरून काढीन.
६ पण तुझ्याजवळ हे आहे: तू निकलाइतांच्या
कृत्यांचा द्वेष करतेस, आणि मीही त्यांचा द्वेष करतो.
७ आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला कान
आहे तो ऐको.

जो विजय मिळवतो त्याला मी देवाच्या बागेतल्या जीवनाच्या झाडावरून खायला देईन.

८ "**आणि स्मुर्णामधील** मंडळीच्या देवदूताला लिही:
जो पहिला आणि शेवटला आहे, मृत झाला
होता आणि जिवंत आहे तो हे म्हणतो:
९ मी तुझे दुःख आणि दारिद्र्य जाणतो, पण तू
सधन आहेस. आणि जे म्हणतात आम्ही यहुदी
आहोत, आणि जे नाहीत, पण सैतानाचे सभास्थान
आहेत अशा लोकांचे दुर्भाषण मी जाणतो. १० तू जे जे
सोसशील त्यांतल्या कशालाच भिऊ नको; पण
तुमची परीक्षा व्हावी म्हणून सैतान तुमच्यामधील
कित्येकांना तुरुंगातील टाकील; आणि तुमचा दहा
दिवस छळ होईल. तू मरणापर्यंत विश्वासू रहा,
आणि मी तुला जीवनाचा मुगुट देईन.
११ आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला
कान आहे तो ऐको.

जो विजय मिळवतो त्याला दुसरे मरण अपाय करणार नाही.

१२ "**आणि पर्गममधील** मंडळीच्या देवदूताला लिही:
ज्याच्याजवळ धारदार दुधारी तरवार आहे तो हे
म्हणतो:
१३ तू कोठे रहात आहेस हे मी जाणतो; जेथे
सैतानाचे आसन आहे तेथे; आणि माझे नाव तू
बळकट धरले आहेस; आणि जेथे सैतान राहतो तेथे
तुमच्यात माझा साक्षी, माझा विश्वासू अंतिपा हा
ज्या दिवसांत मारला गेला, तेव्हादेखील तू माझा
विश्वास नाकारला नाहीस.
१४ पण तुझ्याविरुद्ध माझ्याजवळ काही गोष्टी
आहेत. कारण मूर्तींना वाहिलेली अर्पणे खाणे व
जारकर्म करणे, हा अडथळा इस्राएलाच्या वंशजांपुढे
ठेवण्यास बालाकाला ज्याने शिकवले, त्या
बलामाची शिकवण ज्यांनी स्वीकारली आहे असे
लोक तुझ्याजवळ आहेत.
१५ आणि तशीच निकलाइतांची शिकवण ज्यांनी
स्वीकारली आहे असेही लोक तेथे तुझ्याजवळ
आहेत. १६ पश्चात्ताप कर; नाहीतर, मी तुझ्याकडे
लवकर येईन आणि माझ्या तोंडातील तरवारीने मी
त्यांच्याशी लढाई करीन.
१७ आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला
कान आहे तो ऐको.

जो विजय मिळवतो त्याला मी गुप्त ठेवलेल्या मान्न्यातून खायला देईन, आणि एक पांढरा खडा देईन; त्या खड्यावर एक नवे नाव लिहिलेले असेल, आणि ते तो घेणाऱ्याशिवाय दुसऱ्या कोणाला कळणार नाही.

१८ "**आणि थुवतिरामधील** मंडळीच्या देवदूताला
लिही:
ज्याचे डोळे अग्नीसारखे आहेत आणि ज्याचे
पाय सोनपितळेसारखे आहेत तो देवाचा पुत्र हे
म्हणतो:
१९ मी तुझी कामे, तुझी प्रीती आणि विश्वास,
सेवा आणि धीर जाणतो, आणि तुझी शेवटली कामे
पहिल्यांपेक्षा अधिक आहेत हेही जाणतो.
२० पण माझ्याजवळ तुझ्याविरुद्ध हे आहे:
इजबेल ही जी स्त्री आपल्या स्वतःला संदेष्ट्री म्हणवते
तिला तू माझ्या दासांना जारकर्म करायला आणि

मूर्तींना वाहिलेली अर्पणे खायला शिकवू देतेस आणि भुलवू देतेस. [२१]मी तिला पश्चात्ताप करायला काळ दिला आहे, पण ती आपल्या जारकर्माचा पश्चात्ताप करू इच्छीत नाही. [२२]पण मी तिला खाटल्यावर पाडीन आणि जे तिच्याशी व्यभिचार करतात ते तिची कृत्ये सोडून पश्चात्ताप करणार नाहीत, तर मी त्यांना मोठ्या संकटात पाडीन. [२३]मी तिच्या मुलांना मरीने ठार मारीन, आणि सर्व मंडळ्यांना हे कळेल की, मने व अंतःकरणे जाणणारा मी आहे. आणि मी तुमच्या कामांप्रमाणे तुमच्यामधील प्रत्येकाला देईन.

[२४]पण ज्या तुम्ही ते शिक्षण घेतले नाही व ज्यांना सैतानाची गुजे म्हणतात ती ज्या तुम्हाला कळलेली नाहीत, असे थुवतिरामधील तुम्ही जे इतर आहा, त्या तुम्हाला मी सांगतो की, मी तुमच्यावर दुसरा भार घालणार नाही. [२५]पण तुमच्याजवळ जे आता आहे ते मी येईपर्यंत बळकट धरा.

[२६]जो विजय मिळवतो आणि शेवटपर्यंत काम करतो त्याला माझ्या पित्याकडून मला मिळाल्याप्रमाणे मी राष्ट्रांवर अधिकार देईन. [२७]तो त्यांच्यावर लोहदंडाने अधिकार चालवील आणि कुंभाराच्या मडक्याप्रमाणे त्यांच्या ठिकऱ्या पडतील. [२८]मी त्याला प्रभाततारा देईन.

[२९]आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला कान आहे तो ऐको.

## ३

"आणि सार्दिसमधील मंडळीच्या देवदूताला लिही:

ज्याच्याजवळ देवाचे सात आत्मे, आणि सात तारे आहेत तो हे म्हणतो:

मी तुझी कामे जाणतो; तू जिवंत आहेस असे नाव तुला मिळाले आहे, पण तू मृत आहेस; [२]म्हणून जागृत रहा, आणि ज्या राहिलेल्या गोष्टी मरायला टेकल्यात त्या सावरून धर, कारण मला तुझी कामे माझ्या देवासमोर पूर्ण झालेली आढळली नाहीत. [३]ह्यासाठी तू कसे स्वीकारलेस आणि कसे ऐकलेस ह्याची आठवण कर; ते बळकट धर आणि पश्चात्ताप कर. जर तू जागृत राहिली नाहीस, तर मी चोरासारखा तुझ्यावर येईन, आणि कोणत्या घटकेस मी तुझ्यावर येईन हे तुला समजणार नाही.

[४]तरी ज्यांनी आपली वस्त्रे विटाळवली नाहीत अशी थोडी नावे सार्दिसमध्ये तुझ्याजवळ आहेत. ते शुभ्र वस्त्रांत माझ्याबरोबर चालतील, कारण ते लायक आहेत.

[५]जो विजय मिळवतो त्याला अशा प्रकारे शुभ्र वस्त्रे पेहरवली जातील; त्याचे नाव मी जीवनाच्या पुस्तकातून खोडणार नाही; पण पित्यासमोर आणि देवदूतांसमोर मी त्याचे नाव पतकरीन.

[६]आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला कान आहे तो ऐको.

[७]"आणि फिलदेलफियामधील मंडळीच्या देवदूताला लिही:

जो पवित्र आहे, जो खरा आहे, ज्याच्याजवळ दाविदाची किल्ली आहे, जो उघडतो आणि कोणी मनुष्य बंद करीत नाही, आणि जो बंद करतो आणि कोणी मनुष्य उघडीत नाही तो हे म्हणतो:

[८]मी तुझी कामे जाणतो; पण, मी तुझ्यापुढे एक उघडलेले दार ठेवले आहे. कोणीही मनुष्य ते बंद करू शकणार नाही. कारण तुझी शक्ती थोडी आहे, तू माझे वचन पाळले आहेस आणि माझे नाव नाकारले नाहीस. [९]बघ, सैतानाच्या सभास्थानातील जे लोक आपण यहुदी आहोत असे म्हणतात, जे नाहीत पण लबाडी करतात, त्यांच्यातले काही मी तुला देतो. बघ, मी त्यांना तुझ्याकडे यायला आणि तुझ्या पायांपुढे नमन करायला लावीन, आणि मी तुझ्यावर प्रीती केली हे ओळखायला लावीन. [१०]तू माझ्या धीराचे वचन राखले आहेस म्हणून पृथ्वीवर राहणाऱ्यांची परीक्षा करायला जो परीक्षेचा प्रसंग साऱ्या जगावर येणार आहे त्यापासून मीही तुला राखीन. [११]मी लवकर येतो. तुझा मुगुट कोणी तुझ्याकडून घेऊ नये म्हणून तुझ्याजवळ आहे ते बळकट धर.

[१२]जो विजय मिळवतो त्याला मी माझ्या देवाच्या मंदिरात स्तंभ करीन; आणि तो कधीही बाहेर जाणार नाही. मी त्याच्यावर माझ्या देवाचे नाव, आणि माझ्या देवापासून स्वर्गातून उतरणाऱ्या नव्या यरुशलेमचे, माझ्या देवाच्या नगरीचे नाव, आणि माझे नवे नाव लिहीन.

१३आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला
कान आहे तो ऐको.

१४"आणि लावदिकियाच्या मंडळीच्या देवदूताला
लिही:

जो आमेन, जो विश्वासू आणि खरा साक्षी, जो
देवाच्या उत्पत्तीचा उगम आहे तो हे म्हणतो:
१५मी तुझी कामे जाणतो; तू थंड नाहीस किंवा
गरम नाहीस; तू थंड किंवा गरम असतीस तर बरे
झाले असते. १६पण तू कोमट आहेस, थंड किंवा
गरम नाहीस म्हणून मी तुला माझ्या तोंडातून ओकून
टाकीन. १७कारण तू म्हणतेस, 'मी सधन आहे,
आणि संपन्न झाले आहे; आणि मला कशाची गरज
नाही.' पण तू कष्टी, लाचार आणि दरिद्री, अंधळी
आणि उघडी आहेस हे तू जाणत नाहीस. १८म्हणून
मी तुला मसलत देतो की, तुला संपन्न होता यावे
म्हणून तू माझ्याकडून अग्नीत शुद्ध केलेले सोने
विकत घे. तुझ्या नग्नतेची लज्जा दिसू नये म्हणून तुला
पेहरायला शुभ्र वस्त्रे घे, आणि तुला दिसावे म्हणून
तुझ्या डोळ्यांत घालायला अंजन घे.

१९मी जितक्यांवर प्रीती करतो तितक्यांना मी
दोष लावतो आणि शासन करतो; म्हणून ईर्ष्या धर
आणि पश्चात्ताप कर.

२०बघ, मी दाराशी उभा आहे आणि ठोकीत
आहे. कोणी मनुष्य जर माझा आवाज ऐकून दार
उघडील, तर मी त्याच्याकडे आत येईन आणि
त्याच्याबरोबर जेवीन, आणि तो माझ्याबरोबर
जेवील.

२१जसा मी स्वतः विजय मिळवला, आणि मला
माझ्या पित्याच्या राजासनावर त्याच्याबरोबर
बसविले आहे, तसा जो विजय मिळवील त्याला मी
माझ्या राजानसावर माझ्याबरोबर बसू देईन.

२२आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला
कान आहे तो ऐको."

४ मग मी बघितले आणि बघा, स्वर्गात एक
उघडलेले दार होते, आणि माझ्याशी बोलणारा जो
कर्ण्यासारखा आवाज मी प्रथम ऐकला होता तो म्हणाला,
"इकडे वर ये, आणि ज्या गोष्टी ह्यापुढं झाल्या
पाहिजेत त्या मी तुला दाखवीन."

२मी लगेच आत्म्यात संचरलो, आणि बघा, स्वर्गात
एक राजासन ठेवलेले होते व राजासनावर एक बसला
होता. ३आणि जो बसला होता तो हिऱ्यासारखा व
माणकाच्या खड्यासारखा दिसत होता; त्या राजासनाच्या
सभोवताली एक मेघधनुष्य होते; ते दिसण्यात पाचूसारखे
होते. ४आणि राजासनाच्या सभोवताली चोवीस आसने व
आसनांवर चोवीस वडील बसले होते हे मी बघितले.
त्यांनी शुभ्र वस्त्रे पेहरली होती आणि त्यांच्या डोक्यांवर
सोन्याचे मुगुट होते ५आणि त्या राजासनातून विजांचे
लखलखाट, आवाज व गडगडाट निघत होते. आणि
राजासनासमोर अग्नीचे सात दिवे जळत होते; ते देवाचे
सात आत्मे आहेत. ६आणि राजासनासमोर जणू काचेचा,
स्फटिकासारखा समुद्र होता. राजासनाच्या मध्यभागी
आणि राजासनाच्या सभोवताली चार प्राणी होते; ते मागून
पुढून डोळ्यांनी पूर्ण भरलेले होते. ७पहिला प्राणी
सिंहासारखा आणि दुसरा प्राणी गोऱ्ह्यासारखा होता;
तिसऱ्या प्राण्याला मनुष्यासारखे तोंड होते, आणि चौथा
प्राणी उडणाऱ्या गरुडासारखा होता. ८त्या चार प्राण्यांना
प्रत्येकी सहा पंख होते; ते सभोवताली आणि आतून
डोळ्यांनी पूर्ण भरलेले होते. ते अहर्निश, विसावा न घेता,
म्हणतात की,

'पवित्र, पवित्र, पवित्र,
जो होता, आहे आणि येणार आहे,
तो सर्वसमर्थ परमेश्वर देव.'

९आणि राजासनावर जो बसला असून युगानुयुग
जिवंत आहे त्याला जेव्हा ते चार प्राणी गौरव, मान आणि
धन्यवाद देतात, १०तेव्हा तेव्हा, ते चोवीस वडील
राजासनावर जो बसला आहे त्याच्यापुढे पालथे पडतात,
आणि जो युगानुयुग जिवंत आहे त्याला नमन करतात,
आणि आपले मुगुट राजासनापुढे ठेवून म्हणतात,

११'हे परमेश्वरा, आमच्या देवा,
तू गौरव, मान आणि सत्ता घेण्यास
योग्य आहेस;
कारण तू सर्व गोष्टी उत्पन्न केल्यास,
त्या तुझ्या इच्छेने अस्तित्वात आल्या
आणि उत्पन्न केल्या गेल्या आहेत.'

**५ आणि जो राजासनावर** बसला होता त्याच्या
उजव्या हातात मी एक गुंडाळी बघितली. ती आतून
बाहेरून लिहिलेली होती व सात शिक्के लावून बंद
केलेली होती. २आणि मला एक बलवान देवदूत दिसला.
तो मोठ्या आवाजात पुकारीत होता: 'ही गुंडाळी
उघडायला आणि हिचे शिक्के फोडायला कोण लायक
आहे?'

३आणि ती गुंडाळी उघडू शकेल किंवा तिच्याकडे
पाहू शकेल असा कोणी स्वर्गात किंवा पृथ्वीवर, किंवा
पृथ्वीच्या खालीही नव्हता. ४आणि ती गुंडाळी उघडायला
किंवा तिच्याकडे पाहायला योग्य असलेला कोणी
सापडला नाही तेव्हा मी फार रडलो. ५तेव्हा वडिलांतला
कोणीएक मला म्हणतो,

"रडू नकोस; बघ, यहुदाच्या वंशातला सिंह आणि
दाविदाचा अंकुर हा ती गुंडाळी आणि तिचे सात शिक्के
उघडायला विजयी झाला आहे."

६आणि राजासनाच्या व चार प्राण्यांच्या मध्यभागी
आणि वडिलांच्या मध्यभागी उभा असलेला, एक जणू
वधलेला कोकरा मी बघितला. त्याला सात शिंगे व सात
डोकी होती. ते संपूर्ण पृथ्वीवर पाठविण्यात आलेले देवाचे
सात आत्मे आहेत. ७तो गेला, आणि त्याने जो
राजासनावर बसला होता त्याच्या उजव्या हातातून ती
गुंडाळी घेतली.

८आणि त्याने गुंडाळी घेतली तेव्हा ते चार प्राणी व
चोवीस वडील कोकऱ्यापुढे पालथे पडले. त्यांच्यातील
प्रत्येकाजवळ वीणा होत्या व धुपाने भरलेल्या सोन्याच्या
वाट्या होत्या. त्या पवित्र जनांच्या प्रार्थना होत्या. ९ते एक
नवे गीत गात होते आणि म्हणत होते:

'तू ही गुंडाळी घ्यायला
आणि तिचे शिक्के उघडायला
योग्य आहेस;
कारण तू वधला गेला होतास,
आणि तू आपल्या रक्ताने प्रत्येक वंशामधून,
प्रत्येक भाषा बोलणाऱ्यांमधून,
समाजामधून आणि राष्ट्रामधून
देवासाठी लोक विकत घेतले आहेस.
१०त्यांना आमच्या देवासाठी एक राज्य
आणि याजक केले आहेस,
आणि ते पृथ्वीवर राज्य करतील.'

११आणि मी बघितले, आणि राजासनाच्या व त्या
प्राण्यांच्या, आणि वडिलांच्या सभोवताली मी पुष्कळ
देवदूतांचा आवाज ऐकला. त्यांची संख्या अयुतायुत
आणि सहस्रांच्या सहस्रपट होती. १२ते मोठ्या आवाजात
म्हणत होते:

'वधलेला कोकरा हा सत्ता, धन,
सुज्ञता आणि बळ,
मान, गौरव आणि धन्यवाद
घ्यायला योग्य आहे.'

१३आणि मी ऐकले की, स्वर्गातील व पृथ्वीवरील,
पृथ्वीखालील व समुद्रातील सर्व सृष्ट जीव आणि त्यातील
सर्व म्हणत होते:

'राजासनावर बसणाऱ्याला आणि कोकऱ्याला
धन्यवाद, मान, गौरव आणि सत्ता
युगानुयुग आहेत.'

१४तेव्हा ते चार प्राणी 'आमेन' म्हणाले, आणि वडील
पालथे पडले व त्यांनी नमन केले.

**६ आणि मी बघितले की**, कोकऱ्याने सात
शिक्क्यांतला एक शिक्का उघडला, आणि मी
ऐकले की, गडगडाट व्हावा अशा आवाजात त्या चार
प्राण्यांतील एकाने म्हटले, 'ये'. २तेव्हा मी बघितले, आणि
बघा, एक पांढरा घोडा, आणि त्यावर जो बसला होता
त्याच्याजवळ एक धनुष्य होते; त्याला एक मुगुट देण्यात
आला, आणि तो विजय मिळवीत विजय मिळवायला पुढे
गेला.

३आणि त्याने दुसरा शिक्का उघडला तेव्हा मी ऐकले
की, दुसऱ्या प्राण्याने म्हटले, 'ये'. ४आणि दुसरा एक लाल
घोडा बाहेर निघाला, आणि त्यावर जो बसला होता त्याने
पृथ्वीवरून शांती काढावी आणि त्यांनी एकमेकांस ठार
मारावे, हे त्याच्याकडे देण्यात आले. त्याला एक मोठी
तरवार देण्यात आली.

५आणि त्याने तिसरा शिक्का उघडला तेव्हा मी
ऐकले की, तिसऱ्या प्राण्याने म्हटले, 'ये', आणि मी
बघितले आणि बघा, एक काळा घोडा; आणि त्यावर जो
बसला होता त्याच्या हातात एक तराजू होता. ६आणि जणू
त्या चार प्राण्यांच्या मध्यभागी मी एक वाणी ऐकली,
आणि ती म्हणाली, 'एका दिनारास एक माप गहू, आणि

एका दिनारास तीन मापं जव; पण तेल आणि द्राक्षारस नासू नको.'

७आणि त्याने चौथा शिक्का उघडला तेव्हा चौथ्या प्राण्याने 'ये' म्हटल्याचा आवाज मी ऐकला. ८तेव्हा मी बघितले, आणि बघा, एक फिक्कट घोडा, आणि त्यावर जो बसला होता त्याचे नाव मृत्यू होते; आणि त्याच्या मागोमाग अधोलोक आला. आणि, त्यांना पृथ्वीच्या चौथ्या भागावर तरवारीने व भुकेने आणि मरी पाठवून व पृथ्वीवरील पशूंकडून ठार मारण्याचा अधिकार देण्यात आला.

९आणि, त्याने पाचवा शिक्का उघडला तेव्हा जे देवाच्या वचनाकरता व त्यांनी दिलेल्या साक्षीकरता मारले गेले होते त्यांचे आत्मे मी वेदीखाली बघितले. १०ते मोठ्या आवाजात ओरडत म्हणाले, 'हे स्वामी, तू पवित्र आणि खरा आहेस; तू कुठवर न्याय करणार नाहीस, आणि पृथ्वीवर राहणाऱ्यांवर तू आमच्या रक्ताचा सूड घेणार नाहीस?' ११तेव्हा त्यांच्यातील प्रत्येकाला पांढरे झगे देण्यात आले व त्यांना असे सांगण्यात आले की, जे त्यांचे जोडीदार-दास आणि त्यांचे बंधू त्यांच्याप्रमाणेच मारले जाणार आहेत त्यांची संख्या पूर्ण होईपर्यंत अजून आणखी त्यांनी विसावा घ्यावा.

१२आणि त्याने सहावा शिक्का उघडला तेव्हा मी बघितले आणि मोठा भूकंप झाला; आणि सूर्य केसांच्या तरटासारखा काळा झाला व चंद्र रक्तासारखा झाला. १३आणि जसे अंजिराचे झाड मोठ्या वाऱ्याने हलवले जाते तेव्हा आपली फळे गाळते तसे आकाशातील तारे पृथ्वीवर पडले. १४आणि जशी गुंडाळी गुंडाळली जाते तसे आकाश निघून गेले, आणि सर्व डोंगर व बेटे आपल्या ठिकाणांवरून ढळली. १५आणि पृथ्वीचे राजे, सरदार व सेनापती, धनवान व बलवान लोक, दास आणि स्वतंत्र, असे सर्व जण गुहांत व डोंगरांतील खडकांत लपले. १६आणि ते डोंगरांना व खडकांना म्हणाले, 'आमच्यावर पडा, आणि राजासनावर बसलेल्याच्या तोंडापुढून व कोकऱ्याच्या क्रोधापासून आम्हाला लपवा.' कारण त्याच्या क्रोधाचा मोठा दिवस आला आहे, आणि कोण उभा राहू शकेल?

७ मग मला चार देवदूत पृथ्वीच्या चार कोपऱ्यांवर उभे राहिलेले दिसले. त्यांनी पृथ्वीचे चार वारे अडवले होते. म्हणजे पृथ्वीवर किंवा समुद्रावर किंवा कोणत्याच झाडावर वारा वाहू नये. २आणि मला आणखी एक देवदूत सूर्याच्या उगवतीकडून निघताना दिसला. त्याच्याजवळ जिवंत देवाचा शिक्का होता. आणि त्या ज्या चार दूतांकडे पृथ्वीला व समुद्राला अपाय करण्याचे सोपविले होते त्यांना तो मोठ्या आवाजात ओरडत ३म्हणाला, 'आपल्या देवाच्या दासांच्या कपाळांवर आमचे शिक्के करणे पुरे होईपर्यंत तुम्ही पृथ्वीला किंवा समुद्राला किंवा झाडांना अपाय करू नका.' ४आणि ज्यांच्यावर शिक्का मारण्यात आला त्यांची संख्या मी ऐकली. इस्राएलाच्या वंशजांच्या सगळ्या कुळांतील, एक लक्ष चौवेचाळीस हजारांवर शिक्का मारण्यात आला.

५यहुदा वंशातील बारा हजारांवर शिक्का मारण्यात आला.

रुबेन वंशातील बारा हजारांवर, आणि गाद वंशातील बारा हजारांवर,

६आशेर वंशातील बारा हजारांवर, नफताली वंशातील बारा हजारांवर, मनश्शे वंशातील बारा हजारांवर,

७शिमोन वंशातील बारा हजारांवर, लेवी वंशातील बारा हजारांवर, इस्साखार वंशातील बारा हजारांवर,

८जबलून वंशातील बारा हजारांवर, योसेफ वंशातील बारा हजारांवर आणि बन्यामीन वंशातील बारा हजारांवर शिक्का मारण्यात आला.

९त्यानंतर मी बघितले, आणि बघा, सर्व राष्ट्रांतील, वंशांतील, समाजांतील व सर्व भाषा बोलणाऱ्यांतील पुष्कळ लोकांचा, कोणी मोजू शकला नाही एवढा समुदाय पांढरे झगे परिधान करून आणि आपल्या हातात झावळ्या घेऊन राजासनापुढे व कोकऱ्यापुढे उभा होता; १०ते मोठ्या आवाजात ओरडून म्हणाले,

'राजासनावर बसलेल्या
आमच्या देवाकडून
आणि कोकऱ्याकडून तारण आहे.'

११तेव्हा सर्व देवदूत राजासनाच्या, आणि वडिलांच्या व त्या चार प्राण्यांच्या सभोवताली उभे होते; ते राजासनापुढे आपल्या तोंडावर पालथे पडले आणि त्यांनी देवाला नमन करून १२म्हटले,

'आमेन. धन्यवाद,
आणि गौरव आणि सुज्ञता,

उपकारस्मरण आणि मान,
सत्ता आणि बळ
ही युगानुयुग आमच्या देवाची आहेत.
आमेन.'
१३तेव्हा वडिलांतील एकाने उत्तर देऊन मला म्हटले,
"हे पांढरे झगे घातलेले कोण आहेत आणि हे कुठून
आले?'
१४आणि मी त्याला म्हटले,
"महाराज, आपण जाणता."
तेव्हा तो मला म्हणाला,
"हे मोठ्या संकटातून आले आहेत; आणि ह्यांनी
आपले झगे, कोकऱ्याच्या रक्तात धुऊन, पांढरे केले
आहेत. १५म्हणून ते देवाच्या राजासनासमोर आहेत आणि
त्याच्या मंदिरात, अहर्निश, त्याची सेवा करतात. आणि
जो राजासनावर बसतो तो त्यांच्याबरोबर वसती करील.
१६त्यांना ह्यापुढं भूक लागणार नाही किंवा तहानही
लागणार नाही. सूर्य किंवा कोणतीही उष्णता त्यांना
बाधणार नाही. १७कारण राजासनाच्या मध्यभागी
असलेला कोकरा त्यांचा मेंढपाळ होईल, आणि त्यांना
जीवनाच्या पाण्याच्या झऱ्यावर नेईल, आणि देव त्यांच्या
डोळ्यांतले सर्व अश्रू पुसेल."

८ आणि त्याने सातवा शिक्का उघडला तेव्हा
स्वर्गात सुमारे अर्धा तास स्तब्धता झाली. २आणि
जे सात देवदूत देवासमोर उभे राहतात ते मला दिसले;
त्यांना सात कर्णे दिले गेले. ३तेव्हा आणखी एक देवदूत
येऊन वेदीपुढे उभा राहिला; त्याच्याजवळ एक सोन्याचे
धुपाटणे होते. आणि त्याने राजासनापुढच्या सुवर्णवेदीवर
सर्व पवित्र जनांच्या प्रार्थनांबरोबर, धूप अर्पण करावा
म्हणून त्याला पुष्कळ धूप देण्यात आला. ४आणि त्या
धुपाचा धूर त्या देवदूताच्या हातामधून, पवित्र जनांच्या
प्रार्थनांबरोबर देवासमोर वर चढला. ५मग त्या देवदूताने
धुपाटणे घेऊन त्यात वेदीवरचा विस्तव भरला व तो
पृथ्वीवर टाकला; तेव्हा गडगडाट, आवाज आणि विजांचे
लखलखाट होऊन भूकंप झाला. ६मग ज्या सात
देवदूतांजवळ सात कर्णे होते त्यांनी आपले कर्णे
वाजवायला आपल्या स्वतःला तयार ठेवले.
७मग पहिल्याने कर्णा वाजवला तेव्हा रक्तमिश्रित
हिम व अग्नी उद्भवले आणि पृथ्वीवर टाकले गेले; तेव्हा
पृथ्वीचा तिसरा भाग जळून गेला, एकतृतीयांश झाडे
जळून गेली व सर्व हिरवे गवत जळून गेले.
८मग दुसऱ्या देवदूताने कर्णा वाजवला तेव्हा अग्नीने
पेटलेल्या मोठ्या डोंगरासारखे काही समुद्रात टाकले गेले;
तेव्हा एकतृतीयांश समुद्राचे रक्त झाले, ९समुद्रात
असलेल्या ज्या प्राण्यांत जीव होता त्यांतले एकतृतीयांश
प्राणी मेले; आणि एकतृतीयांश तारवे नष्ट झाली.
१०मग तिसऱ्या देवदूताने कर्णा वाजवला तेव्हा
आकाशामधून एक मोठा तारा जळत्या मशालीसारखा
खाली पडला. तो एकतृतीयांश नद्यांवर व पाण्याच्या
झऱ्यांवर पडला. ११आणि, त्या ताऱ्याचे नाव कडू दवणा
आहे; आणि एकतृतीयांश पाण्याचा कडू दवणा झाला
आणि त्या पाण्यामुळे पुष्कळ लोक मेले, कारण ते कडू
झाले होते.
१२मग चौथ्या देवदूताने कर्णा वाजवला तेव्हा
सूर्याच्या तिसऱ्या भागावर, चंद्राच्या तिसऱ्या भागावर
आणि ताऱ्यांच्या तिसऱ्या भागावर प्रहार झाला. त्यामुळे
त्यांचा एकतृतीयांश भाग अंघकारमय झाला, आणि
त्यामुळे दिवसाचा एकतृतीयांश भाग प्रकाशमान झाला
नाही, आणि रात्रीचाही नाही. १३तेव्हा मी बघितले आणि
ऐकले की, एक गरूड अंतराळाच्या मध्यभागी उडत होता
आणि मोठ्या आवाजात म्हणत होता की, 'अजून तीन
देवदूत कर्णे वाजवतील तेव्हा आणखी होणाऱ्या
कर्ण्यांच्या आवाजामुळं पृथ्वीवर राहणाऱ्यांवर आपत्ती
येईल, आपत्ती येईल, आपत्ती येईल.'

९ मग पाचव्या देवदूताने कर्णा वाजवला आणि
मी बघितले की, आकाशामधून पृथ्वीवर एक तारा
पडला; आणि अगाधकूपाच्या डोहाची किल्ली
त्याच्याजवळ देण्यात आली. २तेव्हा त्याने अगाधकूपाचा
डोह उघडला, आणि मोठ्या भट्टीच्या धुरासारखा धूर त्या
डोहातून वर आला. त्या डोहाच्या धुरामुळे सूर्य व
अंतराळ अंघकारमय झाले. ३आणि त्या धुरातून पृथ्वीवर
टोळ आले. आणि पृथ्वीवरील विंचवांना जेवढे स्वातंत्र्य
आहे तेवढे स्वातंत्र्य त्यांना देण्यात आले; ४आणि त्यांना
आज्ञा दिली गेली की, त्यांनी पृथ्वीवरील गवताला,
हिरवळीला किंवा कोणत्याच झाडाला अपाय करू नये,
पण ज्यांच्या कपाळांवर देवाचा शिक्का नाही अशा
माणसांना अपाय करावा. ५त्यांनी त्यांना ठार मारू नये,

पण त्यांना पाच महिने पीडण्यात यावे अशी मुभा त्यांना
दिली गेली. आणि विंचू माणसाला नांगी मारतो तेव्हा
होणाऱ्या पीडेसारखी त्यांची पीडा होणार होती.
६त्या दिवसांत लोक मरण मिळवू पाहतील पण त्यांना
ते मिळणार नाही. ते मरणाची इच्छा धरतील, आणि मरण
त्यांच्यापासून दूर पळेल. ७आणि लढाईसाठी सज्ज
केलेल्या घोड्यांसारखे त्या टोळांचे रूप होते. त्यांच्या
डोक्यांवर सोन्यासारखे जणू मुगुट होते व त्यांची तोंडे
माणसांच्या तोंडासारखी होती. ८त्यांना स्त्रियांच्या
केसांसारखे केस होते; आणि सिंहासारखे त्यांचे दात होते.
९त्यांना त्यांची उरस्त्राणे होती; ती जणू लोखंडी उरस्त्राणे
होती. आणि त्यांच्या पंखांचा आवाज लढाईसाठी धावत
जाणाऱ्या पुष्कळ घोड्यांच्या रथांच्या आवाजासारखा
होता. १०त्यांना विंचवासारख्या शेपट्या आणि नांग्या
आहेत. आणि लोकांना पाच महिने अपाय करण्यास
त्यांच्या शेपट्यांत त्यांची शक्ती आहे. ११त्यांना
अगाधकूपाचा दूत हा त्यांच्यावर राजा आहे. इब्री भाषेत
त्याचे नाव अबद्दोन आहे. आणि हेल्लेणी भाषेत त्याचे
नाव अपुल्लोन आहे.
१२पहिली आपत्ती येऊन गेली; बघा, आणखी दोन
आपत्ती येणार आहेत.
१३मग सहाव्या देवदूताने कर्णा वाजवला आणि
देवासमोरील सुवर्णवेदीच्या चार शिंगांमधून मला एक
वाणी ऐकू आली. १४ती वाणी कर्णा घेतलेल्या सहाव्या
देवदूताला म्हणाली, 'महान फरात नदीवर बांधलेल्या
चौघा देवदूतांना सोड.' १५आणि, एकतृतीयांश माणसांना
ठार मारायला ज्यांना त्या घटकेसाठी, दिवसासाठी,
महिन्यासाठी आणि वर्षासाठी तयार ठेवले होते ते चार
देवदूत सोडले गेले. १६आणि घोडदलाच्या सैन्यांची
संख्या वीस कोटी होती. मी त्यांची संख्या ऐकली. १७ते
घोडे आणि त्यांवर जे बसले होते ते मला दृष्टान्तात असे
दिसले: त्यांची उरस्त्राणे जणू विस्तवासारखी, धूम्रकांत
मण्यासारखी आणि गंधकासारखी होती आणि घोड्यांची
डोकी सिंहांच्या डोक्यांसारखी होती व त्यांच्या तोंडांतून
अग्नी, धूर व गंधक बाहेर निघत, १८ह्या तीन पीडांमुळे,
त्यांच्या तोंडांतून बाहेर निघणाऱ्या अग्नीमुळे, धुरामुळे
आणि गंधकामुळे एकतृतीयांश माणसे मारली गेली.
१९कारण त्या घोड्यांची शक्ती त्यांच्या तोंडांत व शेपटांत
होती. कारण त्यांची शेपटे सापांसारखी असून त्यांना डोकी
आहेत आणि ते त्यांनी अपाय करतात.
२०आणि जे ह्या पीडांमुळे मारले गेले नाहीत त्या
राहिलेल्या माणसांनी तरीही आपल्या हातच्या कामांचा
पश्चात्ताप केला नाही, आणि त्यांनी भुतांची, किंवा ज्यांना
पाहता येत नाही, ऐकता येत नाही आणि चालता येत नाही
अशा सोन्याच्या, रुप्याच्या, पितळेच्या, दगडाच्या किंवा
लाकडाच्या मूर्तींची उपासना करणे सोडले नाही, २१किंवा
त्यांनी आपल्या खुनांचा, आपल्या जादुटोण्याचा,
आपल्या जारकर्माचा किंवा आपल्या चोऱ्यांचा पश्चात्ताप
केला नाही.

१० मग मला आणखी एक देवदूत स्वर्गातून
खाली येताना दिसला. त्याने एक ढग परिधान
केला होता; त्याच्या डोक्यावर मेघधनुष्य होते, त्याचे
तोंड सूर्यासारखे आणि त्याचे पाय अग्नीच्या स्तंभासारखे
होते २आणि त्याच्या हातात एक लहान उघडलेले पुस्तक
होते. त्याने आपला उजवा पाय समुद्रावर आणि डावा
जमिनीवर खाली टेकला. ३आणि तो मोठ्या आवाजात,
सिंह गुरगुरतो तसा ओरडला; आणि तो ओरडला तेव्हा
विजांच्या सात गडगडाटांनी आपले आपले शब्द उच्चारले.
४आणि त्या सात गडगडाटांनी जेव्हा आपले शब्द उच्चारले
तेव्हा मी लिहिणार होतो; पण मी स्वर्गातून एक वाणी
ऐकली; ती मला म्हणाली,
"हे सात गडगडाट जे काही बोलले ते गुप्त ठेव; ते
लिहू नकोस."
५आणि मला जो देवदूत समुद्रावर आणि जमिनीवर
उभा राहिलेला दिसला त्याने आपला उजवा हात
आकाशाकडे वर उचलला; ६आणि जो युगानुयुग जिवंत
आहे, ज्याने आकाश आणि त्यात जे आहे, पृथ्वी आणि
तीवर जे आहे, आणि समुद्र आणि त्यात जे आहे ते उत्पन्न
केले आहे त्याची शपथ वाहून तो म्हणाला, 'आणखी
काळ लागणार नाही, ७पण सातवा देवदूत कर्णा वाजवील
तेव्हा त्याच्या आवाजाच्या दिवसांत, देवाने आपले दास-
संदेष्टे ह्यांना ज्याची सुवार्ता कळविली आहे ते त्याचे
रहस्य पूर्ण होईल.'
८आणि मी स्वर्गातून ऐकलेली वाणी मी पुन्हा
माझ्याशी बोलताना ऐकली आणि ती मला म्हणाली,
"जा, समुद्रावर आणि जमिनीवर जो देवदूत उभा
आहे त्याच्या हातातले ते उघडलेले पुस्तक घे."
९तेव्हा मी त्या देवदूताकडे जाऊन त्याला म्हणालो,

"मला ते लहान पुस्तक दे."
आणि तो मला म्हणाला,
"हे घे आणि खाऊन टाक. ते तुझं पोट कडू करील,
पण ते तुझ्या तोंडात मधासारखं गोड लागेल."
१०आणि मी ते लहान पुस्तक त्या देवदूताच्या हातातून
घेतले आणि खाऊन टाकले. ते माझ्या तोंडात मधासारखे
गोड लागले पण मी ते खाल्ले तेव्हा माझे पोट कडू झाले.
११आणि तो मला म्हणाला,
"तुला पुष्कळ समाजांविषयी, राष्ट्रांविषयी,
निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्यांविषयी आणि राजांविषयी
पुन्हा साक्ष दिली पाहिजे."

## ११

मग मला कोणीतरी एक काठीसारखा
बोरू दिला, आणि मला म्हटले,
"ऊठ, आणि देवाच्या मंदिराचं आणि वेदीचं, आणि
त्यात जे उपासना करतात त्यांचं मोजमाप घे; २पण
मंदिराबाहेरचं अंगण सोड, त्याचं मोजमाप घेऊ नकोस;
कारण ते परजनांना देण्यात आलं आहे आणि ते हे पवित्र
नगर, बेचाळीस महिने आपल्या पायांखाली तुडवतील.
३आणि मी माझ्या दोन साक्षींना अधिकार देईन; आणि ते
तरट पेहरून, एक हजार दोनशे साठ दिवस संदेश देतील."
४पृथ्वीच्या प्रभूसमोर उभे असणारे दोन जैतून आणि
दोन दीपवृक्ष हेच आहेत. ५आणि त्यांना कोणी अपाय
करू इच्छीत असल्यास त्यांच्या तोंडातून अग्नी निघतो
आणि त्यांच्या वैऱ्यांना गिळून घेतो आणि जर कोणी
मनुष्य त्यांना अपाय करू इच्छील तर तो अशा प्रकारे
मारला जाणे आवश्यक आहे. ६त्यांच्या संदेशाच्या
दिवसांत पाऊस पडू नये म्हणून त्यांना आकाश बंद
करण्याचा अधिकार आहे. त्यांना सर्व जलाशयांवर त्यांचे
रक्त करायचा अधिकार, आणि पृथ्वीवर, त्यांना वाटेल
तितक्या वेळा, सर्व प्रकारच्या पीडा आणून प्रहार
करायचा अधिकार आहे.
७त्यांची साक्ष पुरी झाल्यावर अगाधकूपातून जो पशू
वर येईल तो त्यांच्याबरोबर लढाई करील, त्यांच्यावर
विजय मिळवील आणि त्यांना ठार मारील. ८आणि
ज्याला, आत्मिक दृष्ट्या, 'सदोम' आणि 'मिसर' म्हटले
आहे व जेथे त्याच्या प्रभूलाही वधस्तंभावर खिळले होते
त्या मोठ्या नगराच्या रस्त्यात त्यांची प्रेते पडतील.
९आणि निरनिराळ्या समाजांतले, निरनिराळ्या वंशांतले,
निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्यांतले व निरनिराळ्या राष्ट्रांतले
लोक साडेतीन दिवस त्यांची प्रेते पाहतील, आणि ते
त्यांची प्रेते थडग्यांत ठेवू देणार नाहीत. १०आणि
त्यांच्यावरून पृथ्वीवर राहणारे आनंद करतील, उत्सव
करतील आणि एकमेकांना देणग्या देतील. कारण त्या दोन
संदेष्ट्यांनी पृथ्वीवर राहणाऱ्यांस पीडले होते.
११आणि साडेतीन दिवसांनंतर त्यांच्या देवाकडून
जीवनाचा आत्मा आला, आणि ते आपल्या पायांवर उभे
राहिले; आणि त्यांना पाहणाऱ्यांवर मोठी दहशत पडली.
१२आणि त्यांनी स्वर्गातून एक मोठा आवाज ऐकला, तो
त्यांना म्हणाला, 'इकडे वर या.' आणि ते एका ढगातून
स्वर्गात वर गेले आणि त्यांच्या वैऱ्यांनी त्यांना पाहिले.
१३आणि त्याच घटकेस मोठा भूकंप झाला; तेव्हा
नगराचा दहावा भाग पडला, आणि भूकंपात सात हजार
लोक ठार झाले तेव्हा बाकीचे भयभीत झाले व त्यांनी
स्वर्गीच्या देवाला गौरव दिले.
१४दुसरी आपत्ती येऊन गेली; बघा, तिसरी आपत्ती
लवकरच येत आहे.
१५मग सातव्या देवदूताने कर्णा वाजवला तेव्हा
स्वर्गात मोठे आवाज उमटले; त्यांचे शब्द असे होते:
'जगाचं राज्य हे आपल्या प्रभूचं,
आणि त्याच्या ख्रिस्ताचं झालं आहे;
तो युगानुयुग राज्य करील.'
१६तेव्हा देवासमोर आपआपल्या आसनांवर बसलेले
चोवीस वडील आपल्या तोंडावर पडले आणि त्यांनी
देवाला नमन करून १७म्हटले,
'सर्वसमर्थ देवा, परमेश्वरा,
तू जो आहेस आणि होतास
त्या तुझे आम्ही उपकार मानतो,
कारण तुझी महान सत्ता
तू आपल्याकडे घेतली आहेस
आणि तू राज्य चालवीत आहेस;
१८राष्ट्रं खवळली आहेत
आणि तुझा कोप प्रगट झाला आहे
आणि असा काळ आला आहे की,
मृतांचा न्याय केला जावा,
आणि तू आपल्या दासांना,
तुझ्या संदेष्ट्यांना, पवित्र जनांना
आणि जे तुझ्या नावाचं भय धरतात
अशा लहानथोरांना प्रतिफळ द्यावंस,

आणि जे पृथ्वीचा नाश करतात
त्यांना नष्ट करावंस.'

१९तेव्हा देवाचे स्वर्गातील मंदिर उघडले आणि
त्याच्या मंदिरात त्याच्या कराराचा कोश दिसला; आणि
विजांचे लखलखाट, आवाज आणि गडगडाट होऊन
भूकंप झाला व गारांची मोठी वृष्टी झाली.

## १२

आणि स्वर्गात एक महान चिन्ह दिसले;
सूर्य परिधान केलेली एक स्त्री, तिच्या
पायांखाली चंद्र होता, आणि तिच्या डोक्यावर बारा
ताऱ्यांचा मुगुट होता. २ती गरोदर असल्यामुळे तिला वेणा
येत असता आणि प्रसवायला क्लेश होत असता ती
ओरडत होती.

३आणि स्वर्गात दुसरे एक चिन्ह दिसले. बघा, एक
मोठा, लाल अजगर; त्याला सात डोकी व दहा शिंगे होती
आणि त्याच्या डोक्यांवर सात मुगुट होते. ४आणि त्याच्या
शेपटाने आकाशातील एकतृतीयांश तारे खाली ओढले
आणि पृथ्वीवर पाडले; आणि जी स्त्री प्रसूत होणार होती
तिचे मूल जन्मताच गिळून घ्यावे म्हणून अजगर तिच्यापुढे
उभा राहिला. ५आणि सर्व राष्ट्रांवर लोहदंडाने अधिकार
चालवील अशा मुलास म्हणजे पुसंतानास तिने जन्म
दिला. त्या मुलाला देवाकडे व त्याच्या राजासनाकडे
उचलून नेण्यात आले. ६आणि ती स्त्री रानात पळाली; तेथे
तिचे एक हजार दोनशे साठ दिवस पोषण व्हावे म्हणून
तिच्यासाठी देवाने तयार केलेले ठिकाण आहे.

७आणि स्वर्गात युद्ध झाले. मिखाएल व त्याचे दूत हे
अजगराविरुद्ध लढले, आणि अजगर व त्याचे दूत लढले.
८पण ते प्रबळ झाले नाहीत, आणि त्यापुढे स्वर्गात त्यांचे
स्थान आढळले नाही. ९आणि तो मोठा अजगर, तो
पुरातन सर्प, म्हणजे ज्याला दियाबल म्हणतात, तो
सगळ्या जगाला फसविणारा सैतान बाहेर टाकला गेला.
तो पृथ्वीवर टाकला गेला आणि त्याच्याबरोबर त्याचे
दूतही टाकले गेले.

१०आणि मी स्वर्गात एक मोठा आवाज ऐकला;
त्याचे शब्द असे होतेः

'आता आमच्या देवाचं तारण,
आणि सामर्थ्य आणि राज्य आलं आहे.
आणि त्याच्या ख्रिस्ताची सत्ता आली आहे.
कारण आमच्या बांधवांवर आरोप करणारा,
जो आमच्या देवापुढं स्वर्गात
त्यांच्यावर आरोप करीत असे,
तो खाली लोटला गेला आहे.
११त्यांनी कोकऱ्याच्या रक्ताद्वारे,
आपल्या साक्षीच्या वचनाद्वारे,
त्याच्यावर विजय मिळवला आहे.
आणि त्यांनी मरणापर्यंत
आपल्या जिवावर प्रीती केली नाही.
१२म्हणून स्वर्गांनो,
आणि त्यांत वसती करणाऱ्यांनो,
आनंद करा.
पृथ्वीवर आणि समुद्रात राहणाऱ्यांस हळहळ!
कारण सैतान खाली तुमच्याकडे
मोठ्या रागानं आला आहे.
कारण त्याला केवळ अल्पकाळ राहिला आहे,
हे तो जाणतो.'

१३आणि अजगराने बघितले की, त्याला पृथ्वीवर
टाकण्यात आले आहे, तेव्हा जिने एक पुरुष जन्मास
आणला होता त्या स्त्रीचा त्याने पाठलाग केला. १४आणि
स्त्रीने तिच्या रानातल्या ठिकाणी उडून जावे म्हणून तिला
मोठ्या गरुडाचे दोन पंख देण्यात आले. आणि तेथे, तिचे
सर्पाच्या तोंडापुढून एकीकडे, एक काळ, दोन काळ,
आणि अर्धा काळ पोषण केले जाईल. १५आणि ती स्त्री
पाण्यात वाहून जाईल असे करावे म्हणून, त्या सर्पाने
तिच्या मागोमाग आपल्या तोंडातून नदीसारखे पाणी
ओतले. १६पण पृथ्वीने स्त्रीला साह्य केले; आणि अजगराने
तोंडातून सोडलेली नदी पृथ्वीने तोंड उघडून गिळून
घेतली.

१७तेव्हा अजगर स्त्रीवर रागावला व जे तिच्या
संतानातून अवशेष राहिलेले देवाच्या आज्ञा पाळीत होते
आणि येशूची साक्ष देत होते त्यांच्याशी लढाई करायला
गेला; आणि समुद्राच्या वाळूवर उभा राहिला.

## १३

आणि मी बघितले की, एक पशू
समुद्रातून वर आला. त्याला दहा शिंगे आणि
सात डोकी होती. त्याच्या शिंगांवर दहा मुगुट होते व
त्याच्या डोक्यांवर देवनिंदात्मक नावे होती.

२आणि मी पाहिलेला पशू जणू चित्त्यासारखा होता,
त्याचे पाय अस्वलासारखे व तोंड सिंहासारखे होते.

त्याला अजगराने आपली सत्ता दिली, आणि आसन दिले आणि मोठा अधिकार दिला.

[३]आणि त्याला मरण यावे, अशा प्रकारे, त्याचे एक डोके घायाळ झाले होते, पण त्याचा प्राणांतिक घाव बरा झाला, आणि सर्व पृथ्वी वाहवा करीत त्याच्यामागे गेली.

[४]आणि त्यांनी अजगराला नमन केले, कारण त्याने आपली सत्ता त्या पशूला दिली; आणि त्यांनी त्या पशूलाही नमन करून म्हटले, 'ह्या पशूसारखा कोण आहे? ह्याच्याशी कोण लढू शकेल?' [५]आणि, त्याला मोठ्या गोष्टी व दुर्भाषणे बोलणारे तोंड दिले होते; आणि त्याला हे करायला बेचाळीस महिने अधिकार दिलेला होता.

[६]त्याने देवाविरुद्ध दुर्भाषण करायला त्याच्या नावाविषयी, त्याच्या मंडपाविषयी, आणि स्वर्गात राहणाऱ्यांविषयी दुर्भाषणे करायला आपले तोंड उघडले.

[७]आणि पवित्र जनांशी लढाई करण्यास, आणि त्यांच्यावर विजय मिळवण्यास त्याला मुभा देण्यात आली आणि त्याला प्रत्येक वंशावर, प्रत्येक समाजावर, प्रत्येक भाषा बोलणाऱ्यांवर आणि प्रत्येक राष्ट्रावर अधिकार दिलेला होता.

[८]आणि ज्यांची नावे जगाच्या स्थापनेपासून वधलेल्या कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली नाहीत असे पृथ्वीवर राहणारे सर्व जण त्या पशूला नमन करतील.

[९]जर कोणाला कान असेल तर तो ऐको. [१०]जर कोणी अटकेसाठी असेल तर त्याने अटकेसाठी जावे; जर कोणी तरवारीने मारील तर त्याला तरवारीने मरावे लागेल. ह्यात पवित्र जनांचा धीर आणि विश्वास आहे.

[११]**आणि मी बघितले की,** आणखी एक पशू जमिनीमधून वर येत आहे. त्याला कोकऱ्यासारखी दोन शिंगे होती, आणि तो अजगरासारखा बोलत होता. [१२]तो पहिल्या पशूची सर्व सत्ता त्याच्यासमक्ष स्वतः चालवतो; आणि ज्या पहिल्या पशूचा प्राणांतिक घाव बरा झाला होता त्याला पृथ्वीने व तीवर राहणाऱ्यांनी नमन करावे असे तो करतो. [१३]तो मोठी चिन्हे करतो; आणि लोकांच्या दृष्टीपुढे आकाशातून पृथ्वीवर अग्नी उतरेल असे तो करतो, [१४]आणि त्याला त्या पशूच्या देखत जी चिन्हे करायची मुभा आहे ती करून दाखवून तो पृथ्वीवर राहणाऱ्यांना फसवतो आणि ज्या पशूला तरवारीचा घाव असून जो जिवंत होता त्याची त्यांनी मूर्ती करावी असे तो पृथ्वीवर राहणाऱ्यांस सांगतो.

[१५]आणि, त्याला त्या पशूच्या मूर्तीत प्राण घालायची मुभा होती. म्हणजे त्या पशूच्या मूर्तीने बोलावे, आणि असे करावे की, जितके लोक त्या पशूच्या मूर्तीला नमन करणार नाहीत तितक्यांचा वध केला जावा. [१६]आणि तो असे करतो की, लहान व मोठे, धनवान व दरिद्री, स्वतंत्र व दास, अशा सर्वांनी आपल्या उजव्या हातावर किंवा कपाळांवर एक खूण घ्यावी, [१७]आणि ती खूण, म्हणजे त्या पशूचे नाव किंवा त्याच्या नावाची संख्या धारण करणाऱ्या लोकांशिवाय इतर कोणाला काही विकत घेता येऊ नये किंवा विकता येऊ नये. [१८]येथे ज्ञानीपण हेच आहे; ज्याला बुद्धी असेल त्याने पशूच्या संख्येचा हिशोब करावा. कारण, ती एका मनुष्याची संख्या आहे, आणि त्याची संख्या सहाशे सहासष्ठ आहे.

## १४

**आणि मी बघितले,** आणि बघा, सियोन डोंगरावर एक कोकरा उभा होता; आणि ज्यांच्या कपाळांवर त्याचे व त्याच्या पित्याचे नाव लिहिले होते, असे एक लक्ष चौवेचाळीस हजार जण तेथे त्याच्याबरोबर होते. [२]आणि मी स्वर्गातून एक आवाज ऐकला; तो जणू अनेक प्रवाहांचा आवाज आणि मोठ्या गडगडाटाचा आवाज होता. आणि जणू वीणावादक आपल्या वीणा वाजवीत आहेत असा आवाज मी ऐकला. [३]आणि ते राजासनासमोर, त्या चार प्राण्यांसमोर आणि वडिलांसमोर जणू एक नवे गीत गात होते; आणि पृथ्वीवरून विकत घेतलेले जे एक लक्ष चव्वेचाळीस हजार जण तेथे होते त्यांच्याशिवाय कोणीही मनुष्य ते गीत शिकू शकला नाही. [४]स्त्रियांकडून ज्यांना विटाळ झालेला नाही असे हे आहेत; कारण हे कुमार आहेत. हे जिकडे कोकरा जातो तिकडे त्याच्यामागे जातात; हे देवासाठी व कोकऱ्यासाठी मानवजातीतून विकत घेतलेले प्रथमफळ आहेत. [५]आणि त्यांच्या मुखात काही कपट आढळले नाही; ते निष्कलंक आहेत.

[६]**आणि मला आणखी एक देवदूत** आकाशाच्या मध्यभागी उडताना दिसला. त्याच्याजवळ, पृथ्वीवर राहणाऱ्या प्रत्येक राष्ट्राला, प्रत्येक वंशाला, प्रत्येक भाषा बोलणाऱ्यांना व प्रत्येक समाजाला सुवार्ता सांगायला,

सार्वकालिक सुवार्ता होती. [७]तो मोठ्या आवाजात म्हणत
होता, 'देवाला भ्या, आणि त्याला गौरव द्या; कारण
न्यायाची घटका आली आहे. आणि ज्यानं आकाश,
पृथ्वी आणि समुद्र, आणि पाण्याचे झरे हे सर्व उत्पन्न केले
त्याला नमन करा.' [८]मग आणखी एक देवदूत मागोमाग
आला आणि म्हणाला, 'बाबेल पडली, ती मोठी नगरी
पडली! कारण तिनं सर्व राष्ट्रांना तिच्या जारकर्माच्या
क्षोभाचा द्राक्षारस पाजला आहे.'

[९]आणि तिसरा देवदूत त्यांच्या मागोमाग आला
आणि म्हणाला, 'जर कोणी त्या पशूला किंवा त्याच्या
मूर्तीला नमन करील आणि आपल्या कपाळावर किंवा
हातावर त्याची खूण घेईल [१०]तर तो देवाच्या क्षोभाचा
द्राक्षारस पिईल. तो त्याच्या कोपाच्या प्याल्यात निर्भेळ
ओतण्यात आला आहे. तो पवित्र दूतांसमोर आणि
कोकऱ्यासमोर अग्नीनं आणि गंधकानं पीडला जाईल.
[११]त्यांच्या पीडेचा धूर युगानुयुग वर येतो; त्या पशूला
आणि त्याच्या मूर्तीला नमन करणाऱ्यांना, आणि त्याच्या
नावाची खूण घेणाऱ्या कोणालाही अहोरात्र विसावा नाही.'

[१२]येथे जे पवित्र जन देवाच्या आज्ञांचे व येशूच्या
विश्वासाचे पालन करतात त्यांचा धीर आहे.

[१३]आणि मी स्वर्गातून एक वाणी ऐकली; ती मला
म्हणाली,

"लिही: 'आतापासून, जे प्रभूत मरतील ते मेलेले धन्य
होत.' आत्मा म्हणतो, 'हो, म्हणजे त्यांनी आपल्या
कष्टांपासून विसावा घ्यावा. कारण त्यांची कामे त्यांच्या
मागोमाग जात आहेत.' "

[१४]**तेव्हा मी बघितले, आणि बघा,** एक पांढरा
ढग, आणि मनुष्याच्या पुत्रासारखा कोणी त्या ढगावर
बसला होता. त्याच्या मस्तकावर सोन्याचा मुगुट आणि
त्याच्या हातात एक धारदार विळा होता. [१५]मग मंदिरातून
आणखी एक देवदूत बाहेर आला आणि जो ढगावर
बसला होता त्याला त्याने मोठ्या आवाजात म्हटले,
'विळा चालव आणि कापणी कर, कारण तुझा कापणीचा
काळ आला आहे; कारण पृथ्वीचं पीक पिकलं आहे.'
[१६]मग जो ढगावर बसला होता त्याने पृथ्वीवर विळा
चालवला आणि पृथ्वीची कापणी केली गेली.

[१७]मग आणखी एक देवदूत स्वर्गातील मंदिरामधून
बाहेर आला; त्याच्याजवळही एक धारदार विळा होता.
[१८]मग आणखी एक देवदूत वेदीमधून बाहेर आला; त्याला
अग्नीवर अधिकार होता; आणि ज्याच्याजवळ धारदार
विळा होता त्याला त्याने मोठ्या आवाजात ओरडून
म्हटले, 'तुझा धारदार विळा चालव आणि पृथ्वीच्या
द्राक्षवेलीचे घड गोळा कर; कारण तिची द्राक्षं पुरी पिकली
आहेत.' [१९]तेव्हा त्या देवदूताने पृथ्वीवर विळा घातला
आणि पृथ्वीच्या द्राक्षवेलीचे पीक गोळा करून ते देवाच्या
क्षोभाच्या मोठ्या द्राक्षकुंडात टाकले. [२०]आणि ते द्राक्षकुंड
नगराबाहेर तुडवले गेले व द्राक्षकुंडामधून रक्त वर आले;
ते घोड्याच्या लगामींपर्यंत चढले आणि शंभर कोसांच्या
परिसरात पसरले.

## १५

**आणि मी स्वर्गात** आणखी एक महान व
आश्चर्यकारक चिन्ह बघितले; सात देवदूत,
त्यांच्याजवळ सात पीडा होत्या, त्या शेवटल्या होत्या,
कारण देवाचा क्षोभ त्यात पूर्ण झाला होता.

[२]आणि मी बघितले की, जणू एक अग्निमिश्रित
काचेचा समुद्र आहे, आणि ज्यांनी त्या पशूवर व त्याच्या
मूर्तीवर, आणि त्याच्या नावाच्या संख्येवर विजय प्राप्त
केला होता ते त्या काचेच्या समुद्राजवळ, देवाच्या वीणा
घेऊन उभे राहून [३]देवाचा दास मोशे ह्याचे गीत व
कोकऱ्याचे गीत गात होते. त्यांचे शब्द असे होते:

'सर्वसमर्थ देवा, परमेश्वरा,
तुझ्या कृती महान आणि
आश्चर्यकारक आहेत.
हे राष्ट्रांच्या राजा,
तुझे मार्ग नीतीचे आणि खरे आहेत.
[४]हे परमेश्वरा,
कोण तुला भिणार नाही
किंवा तुझ्या नावाचे गौरव करणार नाही?
कारण तू एकच पवित्र आहेस.
कारण सगळी राष्ट्रे येऊन
तुझ्यापुढे नमन करतील.
कारण तुझे न्याय प्रगट झाले आहेत.'

[५]त्यानंतर मी बघितले, आणि साक्षीच्या मंडपाचे
स्वर्गातील मंदिर उघडले गेले. [६]आणि त्या मंदिरातून सात
देवदूत बाहेर आले; त्यांच्याजवळ सात पीडा होत्या.
त्यांनी स्वच्छ, शुभ्र तागाची वस्त्रे परिधान केली होती
आणि आपल्या छातीभोवती सोन्याचे पट्टे बांधले होते.
[७]तेव्हा त्या चार प्राण्यांतील एकाने त्या सात देवदूतांना,

जो युगानुयुग जिवंत आहे त्या देवाच्या क्षोभाने भरलेल्या, सात सोन्याच्या वाट्या दिल्या. ८आणि, देवाच्या गौरवातील व तेजातील धुराने मंदिर भरले आणि त्या सात देवदूतांच्या सात पीडा पूर्ण होईपर्यंत कोणीही मंदिरात जाऊ शकला नाही.

**१६** आणि मी मंदिरामधून एक मोठा आवाज ऐकला; तो त्या सात देवदूतांना म्हणाला, 'जा, आणि देवाच्या क्षोभाच्या ह्या सात वाट्या पृथ्वीवर ओता.'

२आणि पहिला गेला आणि त्याने आपली वाटी भूतलावर ओतली. आणि, ज्या लोकांवर त्या पशूची खूण होती व जे त्याच्या मूर्तीला नमन करीत असत त्यांना वाईट आणि त्रासदायक फोड आले.

३आणि, दुसऱ्याने आपली वाटी समुद्रावर ओतली आणि त्याचे मेलेल्या माणसाच्या रक्तासारखे रक्त झाले, आणि समुद्रात जगणारे सर्व जीव मेले.

४तिसऱ्याने आपली वाटी नद्यांवर व पाण्याच्या झऱ्यांवर ओतली, आणि त्यांचे रक्त झाले. ५आणि माझ्या कानी आले की, जलाशयांचा देवदूत म्हणाला, 'हे पवित्रा, तू जो आहेस आणि होतास तो तू नीतिमान आहेस, कारण तू असा न्याय केलास. ६कारण त्यांनी पवित्र जनांचं आणि संदेष्ट्यांचं रक्त पाडलं, आणि तू त्यांना रक्त प्यायला दिलंस; कारण ते पात्र आहेत.' ७आणि मी ऐकले की, वेदी म्हणाली, 'हो, हे सर्वसमर्थ देवा, परमेश्वरा, तुझे न्याय खरे आणि नीतीचे आहेत.'

८चौथ्याने आपली वाटी सूर्यावर ओतली, आणि त्याला लोकांना अग्नीने होरपळवायची मुभा देण्यात आली. ९लोक कडक उष्णतेने होरपळले व त्यांनी ह्या पीडांवर ज्याला अधिकार आहे त्या देवाच्या नावाची निंदा केली, आणि त्याला गौरव द्यायला त्यांनी पश्चात्ताप केला नाही.

१०पाचव्याने आपली वाटी त्या पशूच्या राजासनावर ओतली आणि त्याचे राज्य अंधकारमय झाले; आणि त्या क्लेशांत लोकांनी आपल्या जिभा चावल्या. ११त्यांनी आपल्या क्लेशांमुळे आणि आपल्या फोडांमुळे स्वर्गीच्या देवाची निंदा केली, आणि आपल्या कृतींचा पश्चात्ताप केला नव्हता.

१२सहाव्याने आपली वाटी महान फरात नदीवर ओतली, आणि पूर्वेकडील राजांचा मार्ग तयार व्हावा म्हणून तिचे पाणी आटवले गेले. १३आणि मी बघितले की, त्या अजगराच्या मुखातून, त्या पशूच्या मुखातून आणि त्या खोट्या संदेष्ट्यांच्या मुखातून बेडकांसारखे तीन अशुद्ध आत्मे बाहेर आले. १४कारण ते चिन्हे करणारे भुतांचे आत्मे आहेत; ते सर्वसमर्थ देवाच्या, त्या महान दिवसाच्या लढाईसाठी सर्व जगातल्या राजांना एकत्र जमवायला त्यांच्याकडे जात आहेत. (१५'पहा, मी चोरासारखा येतो; जो जागृत राहतो, आणि आपली वस्त्रे संभाळतो तो धन्य होय! नाहीतर, तो उघडा फिरेल आणि ते त्याची लज्जा पाहतील.') १६आणि त्यांनी त्यांना हर-मगिद्दोन असे इब्री भाषेत नाव असलेल्या एका ठिकाणी एकत्र जमवले.

१७सातव्याने आपली वाटी अंतराळात ओतली व मंदिरामधून, राजासनाकडून एक मोठा आवाज आला; तो म्हणाला, 'झाले.' १८आणि विजांचे लखलखाट, आवाज व गडगडाट होऊन मोठा भूकंप झाला. पृथ्वीवर लोक झाल्यापासून कधी झाला नव्हता इतका मोठा भूकंप झाला. १९त्या महान नगरीचे तीन भाग झाले, राष्ट्रांची नगरे पडली, आणि ती महान बाबेल देवासमोर, तिला त्याच्या कोपाच्या क्षोभाच्या द्राक्षारसाचा प्याला द्यावा म्हणून आठवणीत आणली गेली. २०आणि प्रत्येक बेट पळून गेले व डोंगर कोठेच आढळले नाहीत. २१आणि मण मण वजनाच्या मोठ्या गारा आकाशातून खाली लोकांवर पडल्या आणि त्या गारांच्या पीडेमुळे लोकांनी देवाची निंदा केली; कारण त्यांची पीडा फार मोठी होती.

**१७** मग त्या सात वाट्या घेणारे जे सात देवदूत होते त्यांच्यातला एक येऊन माझ्याशी बोलला आणि म्हणाला,

"इकडे ये, त्या अनेक जलौघांवर जी बसली आहे त्या महावेश्येचा न्यायनिवाडा मी तुला दाखवतो. २पृथ्वीच्या राजांनी तिच्याबरोबर जगरकर्म केलं आणि पृथ्वीवर राहणारे तिच्या जारकर्माच्या द्राक्षारसानं मस्त झाले."

३तेव्हा त्याने मला आत्म्याने अरण्यात नेले आणि मला एका किरमिजी रंगाच्या पशूवर बसलेली एक स्त्री दिसली. तो दुर्भाषणांच्या नावांनी भरला होता आणि

त्याला सात डोकी व दहा शिंगे होती. [४]त्या स्त्रीने जांभळी व किरमिजी वस्त्रे पेहरून सोन्याचा व हिऱ्यामोत्यांचा साज घातला होता. तिच्या हातात, अमंगळ गोष्टींनी व तिच्या जारकर्मांच्या घाणीने भरलेला एक सोन्याचा प्याला होता. [५]तिच्या कपाळावर लिहिलेले नाव एक रहस्य होते, 'महान बाबेल, पृथ्वीवरील वेश्यांची व अमंगळ गोष्टींची आई.'

[६]आणि मी बघितले की, ती स्त्री पवित्र जनांचे रक्त पिऊन व येशूच्या साक्षींचे रक्त पिऊन मस्त झाली होती. आणि तिला बघताच मी मोठ्या विस्मयाने आश्चर्य केले. तेव्हा तो देवदूत मला म्हणाला,

[७]"तू का आश्चर्य करतोस? मी तुला ह्या स्त्रीचं, आणि जो पशू तिला पाठीवर वाहतो, ज्याला सात डोकी आणि दहा शिंगं आहेत त्या पशूचं रहस्य सांगतो. [८]आणि तू जो पशू बघितलास, जो होता, आणि नाही, जो अगाधकूपात येईल आणि नाशात जाईल. आणि जगाच्या स्थापनेपासून ज्यांची नावं जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली नाहीत असे पृथ्वीवर राहणारे त्या पशूला पाहतील तेव्हा आश्चर्य करतील. कारण तो होता, नाही, आणि येणार आहे.

[९]"इथं ज्ञानी मन हवं आहे. ती सात डोकी, ही ती स्त्री ज्यांवर बसली आहे ते सात डोंगर आहेत. [१०]आणि सात राजे आहेत. पाच पडले आहेत, एक आहे, आणि दुसरा अजून आलेला नाही. आणि तो आल्यावर त्याला अल्पकाळ राहणं जरूर आहे. [११]आणि तो जो पशू होता, आणि नाही, तो आठवा आहे. तो सातांपासून झालेला आहे, आणि नाशात जात आहे. [१२]आणि तू बघितलीस ती दहा शिंगं दहा राजे आहेत. त्यांना अजून राज्य मिळालं नाही; पण त्यांना त्या पशूबरोबर, एक घटका राजांसारखा अधिकार मिळतो.

[१३]"ते एकमताचे आहेत, ते आपली सत्ता आणि आपला अधिकार पशूला देतात. [१४]ते कोकऱ्याशी युद्ध करतील आणि कोकरा त्यांना जिंकील कारण तो प्रभूंचा प्रभू आणि राजांचा राजा आहे; आणि जे त्याच्याबरोबर आहेत ते बोलावलेले, निवडलेले आणि विश्वासू आहेत."

[१५]आणि तो मला म्हणतो,

"तू जे जलौघ बघत आहेस, ज्यांवर ती वेश्या बसली आहे, ते निरनिराळे समाज, समुदाय आणि राष्ट्रं, आणि निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक आहेत. [१६]आणि तू बघितलीस ती दहा शिंगं आणि तो पशू त्या वेश्येचा द्वेष करतील. तिला उजाड आणि उघडी करतील, तिचं मास खातील, आणि तिला अग्नीत जाळतील. [१७]कारण त्यांनी एकमनाचे होऊन देवाची वचनं पूर्ण होईपर्यंत, त्याची इच्छा पूर्ण करायला आपलं राज्य पशूला द्यावं हे देवानं त्यांच्या मनात घातलं आहे. आणि तुला जी स्त्री दिसली ती पृथ्वीच्या राजांवर राज्य करणारी मोठी नगरी आहे."

१८ ह्यानंतर मी बघितले की, आणखी एक देवदूत आकाशामधून खाली आला. त्याला मोठा अधिकार होता; आणि त्याच्या तेजाने पृथ्वी प्रकाशित झाली. [२]तो जोरदार आवाजात ओरडून म्हणाला, 'ती महान बाबेल पडली आहे, पडली आहे! ती भुतांना घर झाली आहे, सर्व अशुद्ध आत्म्यांना आसरा, सर्व अशुद्ध आणि ओंगळ पक्ष्यांना आसरा झाली आहे. [३]कारण तिच्या जारकर्माच्या क्षोभाचा द्राक्षारस सर्व राष्ट्रांनी प्राशन केला आहे; आणि पृथ्वीच्या राजांनी तिच्याबरोबर जारकर्म केलं आहे; तिच्या विलासाच्या बळावर पृथ्वीचे व्यापारी सधन झाले.'

[४]आणि मी स्वर्गातून आणखी एक आवाज ऐकला; तो म्हणाला,

"अहो माझ्या लोकांनो, तिच्यामधून बाहेर या. म्हणजे तुम्ही तिच्या पापांत भागीदार होऊ नये आणि तिच्या पीडांत वाटेकरी होऊ नये. [५]कारण तिची पापं स्वर्गापर्यंत पोहोचलीत आणि तिचे अपराध देवानं आठवलेत. [६]तिनं तुम्हाला दिलं तसं तिला द्या. तिला तिच्या कृतींप्रमाणं दुप्पट द्या; आणि तिनं भरलेल्या प्याल्यात तिच्यासाठी दुप्पट भरा. [७]तिनं स्वतःला जेवढं गौरवलं, ती जेवढ्या विलासात राहिली तेवढ्या प्रमाणात तिला पीडा आणि दुःख द्या. कारण ती स्वतःच्या मनात म्हणते, 'मी राणी होऊन बसले आहे, मी विधवा नाही, मी दुःख बघणार नाही.' [८]ह्या कारणांमुळं, तिच्या पीडा तिच्यावर एकाच दिवसात येतील - मरी, शोक आणि दुष्काळ - आणि ती अग्नीनं पुरी जळून जाईल; कारण तिचा न्याय करणारा, परमेश्वर देव बलवान आहे.

[९]"आणि ज्यांनी तिच्याबरोबर जारकर्म केले, जे तिच्याबरोबर विलासात राहिले, ते पृथ्वीचे राजे तिच्या जळण्याचा धूर पाहतील, तेव्हा तिच्याकरता रडतील आणि ऊर बडवतील. [१०]ते तिच्या पीडांच्या भयामुळे दूर उभे राहून म्हणतील, 'हाय हाय! ही मोठी नगरी, ही

पराक्रमी नगरी बाबेल; कारण एका घटकेत तुझा न्याय
ओढवला!'
११"आणि पृथ्वीचे व्यापारी तिच्याकरता रडतील
आणि शोक करतील, कारण आता त्यांचा माल कोणी
विकत घेत नाही. १२सोन्याचा, रुप्याचा, हिऱ्यांचा आणि
मोत्यांचा माल, तसेच तलम तागाचे कापड, जांभळे
कापड, रेशमी कापड आणि किरमिजी कापड, आणि सर्व
प्रकारचे सुवासिक लाकूड, आणि सर्व प्रकारची हस्तिदंती
पात्रे, तशीच सर्व प्रकारची फार किंमती लाकडी, पितळी,
लोखंडी व संगमरवरी पात्रे, १३दालचिनी व उटण्याचे
मसाले, धूप, सुवासिक तेले व ऊद, द्राक्षारस, तेल, सपीठ
आणि गहू, आणि जनावरे, मेंढरे, घोडे व रथ, आणि दास
व माणसांचे जीव कोणी विकत घेत नाही. १४आणि ज्या
फळांची तुझ्या जिवाला वासना होती ती तुझ्यापुढून गेली
आहेत, सर्व स्वादिष्ट आणि सुंदर गोष्टी तुझ्यापुढून गेल्या
आहेत; कोठेच त्या पुन्हा दिसणार नाहीत.
१५"आणि तिच्यामुळे सधन झालेले त्यांचे व्यापारी हे
तिच्या पीडेच्या भयामुळे दूरवर उभे राहून रडतील, शोक
करतील १६आणि म्हणतील, 'हाय हाय! ही मोठी नगरी! ही
जांभळी आणि किरमिजी वस्त्रं पेहरून सोन्याचा आणि
हिऱ्यामोत्यांचा साज घालीत असे. १७कारण एवढं धन
एका घटकेत नष्ट झालं.'
"आणि सगळे तांडेल, गलबतांवरचे सगळे लोक
आणि खलाशी आणि जितके समुद्रावर व्यापार करीत होते
तितके दूरवर उभे राहिले, १८आणि त्यांनी तिच्या
जळण्याचा धूर पाहिला, तेव्हा ते ओरडून म्हणाले,
'कोणती नगरी ह्या मोठ्या नगरीसारखी आहे?' १९आणि
त्यांनी आपल्या डोक्यांत धूळ घातली व ते रडत आणि
शोक करीत ओरडून म्हणाले, 'हाय हाय! ही महान नगरी!
समुद्रावर ज्यांची गलबतं होती ते सर्व हिच्या संपत्तीवर
सधन झालेत! कारण ही एका घटकेत उजाड झाली.'
२०"हे स्वर्गा, अहो पवित्र जनांनो, प्रेषितांनो आणि
संदेष्ट्यांनो, तिच्यावरून आनंद करा; कारण तिच्या
न्यायनिवाड्यात तुमचा न्याय केला आहे."
२१मग एका बलवान देवदूताने मोठ्या जात्याच्या
तळीसारखा एक दगड घेतला, तो समुद्रात फेकला, आणि
तो म्हणाला,
"अशीच ती मोठी नगरी बाबेल जोरात खाली
टाकण्यात येईल, आणि पुन्हा मुळीच सापडणार नाही.
२२तुझ्यात वीणा वाजविणाऱ्यांचा आवाज, गाणाऱ्यांचा,
वाजंत्र्यांचा आणि कर्णे वाजविणाऱ्यांचा आवाज ह्यापुढं
कधी ऐकू येणार नाही. तुझ्यात कोणत्याही धंद्याचा
कारागीर ह्यापुढं कधी आढळणार नाही; आणि तुझ्यात
जात्याचा आवाज ह्यापुढं कधी ऐकू येणार नाही. २३आणि
तुझ्यात दिव्याचा उजेड ह्यापुढं कधी दिसणार नाही;
तुझ्यात वराचा आणि वधूचा आवाज ह्यापुढं ऐकू येणार
नाही. कारण तुझे व्यापारी हे पृथ्वीचे मोठे लोक होते;
आणि तुझ्या जादूटोण्यांनी सर्व राष्ट्रं फसवली गेली.
२४आणि तिच्यात संदेष्ट्यांचे, पवित्र जनांचे आणि
पृथ्वीवर जे मारले गेले त्या सर्वांचे रक्त सापडले."

१९ **आणि ह्या गोष्टींनंतर** मी जणू एक,
विशाल समुदायाचा मोठा आवाज स्वर्गात
ऐकला; त्याचे शब्द असे होते:

'हालेलूया!
तारण, गौरव आणि सत्ता
आमच्या देवाची आहेत,
२कारण त्याचे निर्णय खरे
आणि नीतीचे आहेत;
कारण ज्या महावेश्येने आपल्या
जारकर्मानं पृथ्वी भ्रष्ट केली
तिचा त्यानं न्यायनिवाडा केला आहे.
आणि आपल्या दासांच्या रक्ताबद्दल
तिचा सूड घेतला आहे.'

३आणि ते पुन्हा एकदा म्हणाले,

'हालेलूया!
आणि तिचा धूर युगानुयुग वर चढत आहे.'

४तेव्हा ते चोवीस वडील व चार प्राणी पालथे पडले,
त्यांनी राजासनावर बसलेल्या देवाला नमन केले आणि ते
म्हणाले,

'आमेन, हालेलूया.'

५आणि राजासनाकडून एक आवाज आला; तो
म्हणाला,

'तुम्ही सर्व त्याचे दास,
तुम्ही त्याला भिणारे लहानमोठे,
आपल्या देवाचं स्तवन करा.'

६आणि, मी जणू एका, विशाल समुदायाचा आवाज
ऐकला; तो पुष्कळ जलौघांच्या आवाजासारखा आणि

मोठ्या गडगडाटांच्या आवाजासारखा होता. त्याचे शब्द
असे होते:

'हालेलूया!
कारण, सर्वसमर्थ देव परमेश्वर
राज्य करीत आहे.
७या, आपण आनंद करू, हर्ष करू,
आणि त्याला मान देऊ;
कारण कोकऱ्याचं लग्न निघालं आहे,
आणि त्याच्या नवरीनं
स्वतःला सजवलं आहे.
८आणि तिला पेहरायला,
स्वच्छ, शुभ्र, तलम तागाचं वस्त्र
दिलं गेलं आहे.'

(हे तलम वस्त्र म्हणजे पवित्र जनांच्या नीतिमत्वाच्या कृती
होत.)

९आणि तो मला म्हणाला,

"लिही: 'कोकऱ्याच्या लग्नाच्या भोजनाला
बोलावलेले धन्य होत.' "
आणि तो मला म्हणाला,

"ही देवाची खरी वचनं आहेत."
१०आणि, मी त्याला नमन करायला त्याच्या पायांशी
पालथा पडलो, तेव्हा तो मला म्हणाला,

"पहा, नको; मी तुझा, आणि येशूची साक्ष
ज्यांच्याजवळ आहे त्या तुझ्या बंधूंचा जोडीदार-दास
आहे. देवाला नमन कर. कारण येशूची साक्ष हा संदेशाचा
आत्मा आहे."

११**तेव्हा मी बघितले की,** स्वर्ग उघडला, आणि
बघा, एक पांढरा घोडा, आणि त्यावर जो बसला होता
त्याचे नाव 'विश्वासू आणि खरा' आहे. तो नीतीने न्याय
करतो, आणि युद्ध करतो. १२त्याचे डोळे अग्नीच्या
ज्वालेसारखे होते व त्याच्या डोक्यावर पुष्कळ मुगुट होते.
आणि त्याचे एक नाव लिहिलेले होते. ते त्याच्याशिवाय
कोणी जाणत नाही. १३त्याने एक, रक्तात बुचकळलेला
झगा परिधान केला होता, आणि त्याचे नाव 'देवाचा शब्द'
आहे. १४आणि स्वर्गातल्या सेना पांढऱ्या घोड्यांवर
त्याच्या मागोमाग जात होत्या. त्यांनी शुभ्र, स्वच्छ, तलम
तागाची वस्त्रे परिधान केली होती. १५आणि त्याने राष्ट्रांवर
प्रहार करावा म्हणून त्याच्या तोंडामधून एक धारदार
तरवार निघते. तो त्यांच्यावर लोहदंडाने सत्ता चालवील.
तो सर्वसमर्थ देवाच्या क्षोभाचे व कोपाचे द्राक्षकुंड
तुडवील. १६त्याच्या झग्यावर व त्याच्या मांडीवर 'राजांचा
राजा आणि प्रभूंचा प्रभू' असे नाव लिहिलेले आहे.

१७**आणि मी बघितले की,** एक देवदूत सूर्यावर उभा
होता; तो अंतराळात उडणाऱ्या सर्व पक्ष्यांना मोठ्या
आवाजात ओरडून म्हणाला, 'या, आणि देवाच्या मोठ्या
भोजनासाठी एकवट व्हा. १८म्हणजे तुम्ही राजांचं मास
खाल, सेनापतींचं मास आणि बलवान पुरुषांचं मास
खाल; घोड्यांचं आणि त्यांवर बसणाऱ्यांचं मास खाल,
स्वतंत्र आणि दास, लहान आणि मोठे अशा सर्वांचं मास
खाल.' १९आणि मी बघितले की, तो जो घोड्यावर बसला
होता त्याच्याबरोबर आणि त्याच्या सेनेबरोबर लढाई
करायला तो पशू व पृथ्वीचे राजे आणि त्यांच्या सेना एकत्र
आल्या होत्या. २०मग त्या पशूला व त्याच्याबरोबर त्या
खोट्या संदेष्ट्याला धरण्यात आले. त्याने त्याच्यासमोर
चिन्हे करून, त्या पशूची खूण घेणाऱ्यांस व त्याच्या
मूर्तीला नमन करणाऱ्यांस फसविले होते. ह्या दोघांनाही
गंधकाने जळणाऱ्या अग्नीच्या सरोवरात जिवंत टाकण्यात
आले. २१आणि जो घोड्यावर बसला होता त्याच्याकडून
त्याच्या तोंडातून बाहेर येणाऱ्या तरवारीने बाकी राहिलेले
मारले गेले. आणि त्यांच्या मासाने सगळे पक्षी तृप्त झाले.

# २०

**आणि मी बघितले की,** एक देवदूत
आकाशामधून खाली आला; त्याच्या हातात
अगाधकूपाची किल्ली व एक मोठी साखळी होती. २आणि
ज्याला दियाबल आणि सैतान म्हणतात त्या पुरातन
सर्पाला म्हणजे त्या अजगराला त्याने धरले, एक हजार
वर्षांसाठी त्याला बांधले, ३आणि अगाधकूपात टाकले;
आणि त्यात बंद करून वर शिक्का लावला; म्हणजे ती
हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याने राष्ट्रांना आणखी फसवू नये.
त्यानंतर त्याला अल्पकाळ सोडणे जरूर आहे.

४तेव्हा मी राजासने बघितली व त्यांवर जे कोणी
बसले होते त्यांच्याकडे न्यायनिवाडा देण्यात आला;
आणि येशूच्या साक्षीसाठी व देवाच्या वचनासाठी ज्यांचा
शिरच्छेद झाला होता, आणि त्या पशूला किंवा त्याच्या
मूर्तीला ज्यांनी नमन केले नव्हते आणि आपल्या
कपाळावर किंवा हातांवर त्याची खूण घेतली नव्हती,

त्यांचे आत्मे मला दिसले. ते जिवंत झाले व त्यांनी ख्रिस्ताबरोबर एक हजार वर्षे राज्य केले. [५]पण ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत बाकीचे मेलेले पुन्हा जिवंत झाले नाहीत. हे पहिले पुनरुत्थान होय. [६]ज्याला पहिल्या पुनरुत्थानात भाग आहे, तो धन्य आणि पवित्र होय. अशांवर दुसऱ्या मरणाची सत्ता नाही, पण ते देवाचे आणि ख्रिस्ताचे याजक होतील, आणि ते त्याच्याबरोबर एक हजार वर्षे राज्य करतील.

[७]**ती हजार वर्षे पूर्ण झाल्यावर** सैतान त्याच्या अटकेमधून सोडला जाईल. [८]आणि तो पृथ्वीच्या चारी कोपऱ्यांतील गोग व मागोग ह्या राष्ट्रांना भुरळ घालून, लढाईसाठी एकत्र आणायला बाहेर जाईल. त्यांची संख्या समुद्राच्या वाळूसारखी आहे. [९]ते पृथ्वीच्या विस्तारावर गेले आणि त्यांनी पवित्र जनांची छावणी व प्रिय नगरी वेढली. तेव्हा स्वर्गातून अग्नी उतरला आणि त्याने त्यांना गिळून घेतले. [१०]आणि त्यांना फसवणाऱ्या सैतानाला अग्नीच्या व गंधकाच्या सरोवरात टाकण्यात आले. तो पशू व तो खोटा संदेष्टा हे तेथेच असून ते सर्वकाळ अग्नीने पीडले जातात.

[११]**तेव्हा मी एक, मोठे, शुभ्र राजासन** आणि त्यावर जो बसला होता त्याला बघितले. त्याच्या तोंडापुढून पृथ्वी व आकाश ही पळून गेली, आणि त्यांना कोठेच जागा मिळाली नाही. [१२]मग मी राजासनासमोर उभ्या राहिलेल्या लहानमोठ्या मृतांना बघितले; तेव्हा पुस्तके उघडली गेली व आणखी एक पुस्तक उघडले गेले. ते जीवनाचे पुस्तक होते. आणि त्या पुस्तकात लिहिलेल्या गोष्टींवरून ज्याच्या त्याच्या कामांप्रमाणे मृतांचा न्याय करण्यात आला. [१३]समुद्राने आपल्यामधील मेलेले दिले, आणि मृत्यू व अधोलोक ह्यांनीही आपल्यामधील मेलेले दिले. आणि त्यांच्या कामांप्रमाणे त्यांचा प्रत्येकाचा न्याय करण्यात आला. [१४]आणि मृत्यू व अधोलोक अग्नीच्या सरोवरात टाकले गेले. हे दुसरे मरण होय.

[१५]आणि ज्या कोणाचे नाव जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले आढळले नाही त्याला अग्नीच्या सरोवरात टाकण्यात आले.

## २१

**आणि मी नवे आकाश** आणि नवी पृथ्वी ही बघितली, कारण पहिले आकाश व पहिली पृथ्वी ही नष्ट झाली होती, आणि समुद्रही राहिला नव्हता. [२]आणि मी ती पवित्र नगरी नवी यरुशलेम देवाकडून स्वर्गातून खाली येत असलेली बघितली. ती पतीसाठी साज चढवून तयार केलेल्या वधूप्रमाणे होती. [३]आणि मी राजासनाकडून एक मोठा आवाज ऐकला; तो म्हणाला:

'पहा, देवाचा मंडप मनुष्यांत आहे,
तो त्यांच्याबरोबर वसती करील.
ते त्याची प्रजा होतील,
आणि देव स्वतः त्यांच्याबरोबर राहील.
[४]तो त्यांच्या डोळ्यांतले सर्व अश्रू पुसेल,
आणि ह्यापुढं मरण राहणार नाही,
दुःख नाही, आक्रोश नाही,
किंवा क्लेशही नाहीत.
कारण पहिल्या गोष्टी निघून गेल्या आहेत.'

[५]तेव्हा राजासनावर बसलेला म्हणाला,

"पहा, मी सर्व गोष्टी नव्या करतो."

आणि तो मला म्हणाला,

"लिही, कारण ही वचनं विश्वसनीय आणि खरी आहेत."

[६]आणि तो मला म्हणाला,

"त्या झाल्या आहेत. मी आल्फा आणि ओमेगा, प्रारंभ आणि शेवट आहे. मी जो तान्हेला असेल त्याला जीवनाच्या पाण्याच्या झऱ्यातून फुकट देईन. [७]जो विजय मिळवतो तो ह्या सर्व गोष्टी वारशानं मिळवील; मी त्याचा देव होईन आणि तो माझा पुत्र होईल. [८]पण भेकड, अविश्वासू, अमंगळ, खुनी, जारकर्मी, चेटकी, मूर्तीपूजक आणि सगळे लबाड ह्यांना अग्नीनं आणि गंधकानं जळणाऱ्या सरोवरात वाटा मिळेल; हे दुसरं मरण होय."

[९]**मग ज्या सात देवदूतांनी** त्या सात शेवटल्या पीडांनी भरलेल्या, सात वाट्या घेतल्या होत्या त्यांच्यातला एक येऊन माझ्याशी बोलला, आणि मला म्हणाला,

"इकडे ये, मी तुला वधू दाखवतो; ही कोकऱ्याची नवरी आहे."

[१०]तेव्हा त्याने मला आत्म्याने एका मोठ्या उंच डोंगरावर नेले, आणि त्याने मला ती पवित्र नगरी यरुशलेम देवाकडून, स्वर्गातून खाली येत असलेली दाखवली.

११तिच्या ठायी देवाचे तेज होते; आणि तिचे तेज
अतिमोलवान खड्यासारखे, स्फटिकाप्रमाणे चमकणाऱ्या
हिऱ्याच्या खड्यासारखे होते. १२तिला मोठा आणि उंच
तट होता; त्याला बारा वेशी होत्या, आणि वेशींपुढे बारा
देवदूत होते आणि त्यांवर नावे लिहिलेली होती, ती
इस्राएलाच्या वंशजांच्या बारा कुळांची नावे आहेत.
१३पूर्वेकडे तीन वेशी, उत्तरेकडे तीन वेशी, दक्षिणेकडे तीन
वेशी आणि पश्चिमेकडे तीन वेशी होत्या. १४आणि
नगरीच्या तटाला बारा पाये होते; त्यांवर कोकऱ्याच्या
बारा प्रेषितांची नावे होती. १५आणि जो माझ्याशी बोलत
होता त्याच्याजवळ त्या नगरीचे, तिच्या वेशींचे व तिच्या
तटाचे माप घ्यायला एक सोन्याचा बोरू होता. १६ती नगरी
चौकोनी बांधलेली होती; आणि तिची लांबी जितकी होती
तितकीच तिची रुंदी होती. आणि त्याने बोरूने माप घेतले
ते साडेसातशे कोस भरले. तिची लांबी, रुंदी आणि उंची
ह्या समसमान होत्या. १७आणि त्याने तटाचे माप घेतले, ते
देवदूताच्या म्हणजे माणसाच्या मापाप्रमाणे एकशे
चौवेचाळीस हात भरले.

१८तिच्या तटाचे बांधकाम हिऱ्यांचे होते; आणि नगरी
स्वच्छ काचेप्रमाणे, खरोखर, शुद्ध सुवर्ण होती.

१९आणि नगरीच्या तटाचे पाये अनेक प्रकारचे
मोलवान खडे लावून शृंगारले होते.

पहिला पाया: हिरा, दुसरा: नीलमणी, तिसरा:
गोदंतमणी, चवथा: पाचू, २०पाचवा: पुष्कराज, सहावा:
लाल, सातवा: गोमेद, आठवा: बिरोजा, नववा: पीतमणी,
दहावा: पन्ना, अकरावा: धूम्रकांत, आणि बारावा: याकूत.
२१आणि बारा वेशी बारा मोत्यांच्या होत्या; प्रत्येक वेगळी
वेस एका मोत्याची केली होती. आणि नगरीचा रस्ता शुद्ध
सोन्याचा, जणू पारदर्शक काचेचा होता.

२२आणि मी तेथे मंदिर बघितले नाही. कारण
सर्वसमर्थ देव परमेश्वर आणि कोकरा हेच तिचे मंदिर
आहेत. २३आणि त्या नगरीला प्रकाश द्यायला सूर्याची
किंवा चंद्राची गरज नव्हती; कारण देवाचे तेज तिला
प्रकाश देते, आणि कोकरा तिचा दिवा आहे. २४राष्ट्रे
तिच्या प्रकाशात चालतील; आणि पृथ्वीचे राजे आपले
वैभव तिच्यात आणतील. २५तिच्या वेशी दिवसा कधीही
बंद केल्या जाणार नाहीत, आणि तेथे रात्र होणार नाही.
२६त्या राष्ट्रांकडून गौरव आणि मान तिच्यात आणतील.

२७तेथे कोणतीही निषिद्ध गोष्ट, किंवा अमंगळपणाची
कृती करणारा किंवा लबाडी करणारा कोणीही मनुष्य,
कोणत्याही प्रकारे, प्रवेश करणार नाही. पण कोकऱ्याच्या
जीवनाच्या पुस्तकात ज्यांची नावे लिहिण्यात आली
आहेत त्यांनाच प्रवेश करता येईल.

## २२

१-२आणि त्याने मला देवाच्या आणि
कोकऱ्याच्या राजासनापासून तिच्या
रस्त्याच्या मध्यभागातून वाहणारी जीवनाच्या पाण्याची
स्फटिकासारखी निर्मळ नदी दाखवली. त्या नदीच्या दोन्ही
कडांना जीवनाचे झाड होते; ते बारा जातीची फळे देते व
प्रत्येक महिन्यात आपले फळ देते. आणि त्या झाडाची
पाने राष्ट्रांच्या आरोग्यासाठी आहेत. ३तेथे पुढे काही
शापित राहणार नाही; पण तिच्या ठायी देवाचे व त्याच्या
कोकऱ्याचे राजासन राहील; आणि त्याचे दास त्याची
सेवा करतील. ४ते त्याचे तोंड पाहतील आणि त्याचे नाव
त्यांच्या कपाळांवर राहील. ५तेथे रात्र होणार नाही; आणि
त्यांना दिवसाच्या किंवा सूर्याच्या प्रकाशाची गरज नाही;
कारण परमेश्वर देव त्यांना प्रकाश देतो आणि ते युगानुयुग
राज्य करतील.

६आणि तो मला म्हणाला,

"ही वचनं विश्वसनीय आणि खरी आहेत, आणि,
ज्या गोष्टी लवकर झाल्या पाहिजेत त्या आपल्या दासांना
दाखवाव्यात म्हणून, संदेष्ट्यांच्या आत्म्यांचा देव जो
परमेश्वर त्यानं आपल्या दूताला पाठवलं आहे."

७"पहा, मी लवकर येतो. ह्या ग्रंथातील संदेश-वचने
वाचणारा धन्य!"

८मी, योहान, हे ऐकत होतो आणि पहात होतो आणि
मी ऐकलेल्या व पाहिलेल्या गोष्टी ज्या देवदूताने मला
दाखवल्या त्याला नमन करायला मी त्याच्या पायांशी
पालथा पडलो. ९तेव्हा तो मला म्हणतो,

"पहा, नको; कारण मी तुझा, तुझ्या संदेष्टे-बंधूंचा
आणि जे ह्या ग्रंथातील वचने वाचतात त्यांचा जोडीदार-
दास आहे; देवाला नमन कर."

१०आणि तो मला म्हणतो,

"तू ह्या ग्रंथातील संदेश-वचनांवर शिक्का लावू नको;
कारण काळ जवळ आला आहे. ११जो अनीतिमान आहे
तो अनीतिमान राहो, जो अमंगळ आहे तो अमंगळ राहो;
नीतिमान आहे तो नीतिमान राहो, पवित्र आहे तो पवित्र
राहो."

[१२]"पहा, मी लवकर येतो. आणि प्रत्येकाला
त्याच्या कामाप्रमाणं द्यायला माझ्याजवळ वेतन आहे.
[१३]मी आल्फा आणि ओमेगा, प्रारंभ आणि शेवट, पहिला
आणि शेवटला आहे.

[१४]"आपल्याला जीवनाच्या झाडावर हक्क मिळावा,
आणि आपण त्या वेशींतून नगरीत जावे म्हणून जे आपली
वस्त्रे धुतात ते धन्य होत. [१५]कारण कुत्रे, चेटकी,
जारकर्मी, खुनी, मूर्तीपूजक, आणि असत्याची आवड
धरणारे व कृती करणारे बाहेर राहतील.

[१६]"मी, येशूनं, तुमच्याकडे ह्या गोष्टींची मंडळ्यांना
साक्ष द्यायला माझ्या दूताला धाडलं आहे. मी दाविदाचा
अंकुर आणि वंश आहे. मी पहाटेचा प्रकाशमान तारा
आहे."

[१७]आणि आत्मा आणि वधू म्हणतात, 'ये', आणि
ऐकणारा म्हणो, 'ये'. आणि तान्हेला आहे तो येवो, आणि
ज्या कोणाची इच्छा असेल तो जीवनाचे पाणी फुकट
घेवो.

[१८]कारण, ह्या ग्रंथातील संदेश-वचने श्रवण
करणाऱ्या प्रत्येकाला मी निक्षून सांगतो की, कोणी मनुष्य
ह्यांत भर घालील तर देव त्याच्यावर ह्या ग्रंथात
लिहिलेल्या पीडा आणील. [१९]त्याचप्रमाणे ह्या संदेश-
ग्रंथातील वचनांमधून जर कोणी काही काढून टाकील, तर
देव ह्या ग्रंथात उल्लेखलेल्या जीवनाच्या झाडामधून व
पवित्र नगरीमधून त्याचा वाटा काढून टाकील.

[२०]ह्या गोष्टींची साक्ष देणारा म्हणतो,

"मी खरोखर लवकर येतो."

आमेन, प्रभू येशू, ये.

[२१]आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याची कृपा तुम्हा
सर्वांबरोबर असो. आमेन.